# मन तळ्यात मळ्यात

अदिती कापडी



ई साहित्य प्रतिष्ठान

# मन तळयात...
# ...मळयात

(लघुकादंबरी)

लेखिका : अदिती कापडी

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव: मन तळयात... मळयात

प्रकार : लघुकादंबरी

लेखिका :

अदिती कापडी,

बदलापूर, जि. ठाणे.

9011403156

shaaru7th@gmail.com

मुखपृष्ठ : कनक बाईकर

अंतर्गत सजावट: कनक वाईकर

औरंगाबाद

8888899126

kanak.waikar@gmail.com

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

*e Sahity Pratishthan®*

*eleventh floor*

*eternity, G1102*

*eastern express highway*

*Thane. 400604*

*Ph : 9869674820*

*esahity@gmail.com*

*www.esahity.com*

*www.ednyaneshwari.com*

*http://etyarth.blogspot.in/*

*http://esahityapratishthan.blogspot.in/*

*www.marathiriyasat.com*

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2012

*To,*
*Respected Mrs. Alka Karkhanis.*

अल्का मॅडम, तुमच्यासाठी...
तुमची शाबासकीची थाप मिळावी म्हणून

पहिलं काहीतरी करण्याचा आणि अनुभवायचा आनंद काहीतरी वेगळाच असतो नाही? आनंद पहिल्या पावलाचा, आनंद पहिल्या प्रयत्नाचा, आणि आनंद......पहिल्या श्रेयाचा ! असंच माझं हे पहिलं वहिलं ई पुस्तक . . . . .
आणि याचं श्रेय जातं एका अशा स्त्रीला जिने माझ्यातल्या एका लेखिकेला शोधलं.. आणि स्फुर्तीचं खतपाणी देऊन तिला अलगद वाढवलं. जिवाचा आकांत करुन मराठी शिकवणारी ही एक शिक्षिका मला कधी ताई, कधी मैत्रीण तर कधी आई म्हणून भेटून निस्सीम माया करत गेली आणि हे पुस्तक त्याचीच एक प्रतिमा आहे.

अश्या या सुंदर स्त्रीला मी माझं पहिलं पुस्तक अर्पण करते.

वास यावा फ़ुलाचा, पण फ़ूल दिसू नये;
कानी यावेत सूर, पण कुठून कळू नये;
असं आपण आश्चर्याच्या वाटेवर
आत आत स्वतःचा शोध घेत निघावं

--मंगेश पाडगांवकर
(गिरकी)

## अनुक्रम

पाठराखीण
घुसमट
दुर्लक्ष
दुनियादारी
चिकित्सा
फ़्री बर्ड
हलकेच
शहाणपण

ही कादंबरी, यातील पात्रं, स्थळे, शाळा सारे सारे काल्पनिक असून त्यांचं कोणाही प्रत्यक्ष व्यक्तीशी किंवा स्थळाशी साधर्म्य आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा.

# पाठराखीण

मी तेव्हा साधारण सातवीत असेन.. शाळेच्या दुपार विभागातील सर्वात मोठे विद्यार्थी म्हणजे आम्हीच.. काय पण रूबाब..! त्यातून शाळा नुकतीच सुरु झाली होती. म्हणजे नवीन कड्डक युनीफॉर्म. मग त्याचा नवानवा वास, त्याची घडी मोडूच नयेसं वाटणं, हे सारं मला खूप खूप आवडायचं. आणि सुरुवातीच्या दिवसांत आमच्या शिक्षिकासुद्धा नवीन नवीन साड्या नेसायच्या आणि मग आम्हा मैत्रीणींमधे त्यावरून मस्त चर्चा रंगायची-

"ए तू गुरव बाईंना पाहिलं.? काय भारी दिसतायत आज!"

"अगं ते सोड. कोकणे मॅडमना बघीतलंस का? लग्नातला शालूच वाटतोय त्यांची आजची साडी म्हणजे.."

"अय्या...हो गं! त्यांच्या साड्या म्हणजे भारीच असतात!"

मुलींमधे अश्या गॉसिप्स होणं काही नविन नाही. थोडक्यात काय तर, आमच्या सर्वांसोबत शाळेलाही नवीन रंग दिलाय असंच वाटायचं.

त्यावर्षी वर्गात बरीच नवीन मुलं मुली आले होते.. आणि मुख्य म्हणजे मला साऱ्या वर्गाचे मॉनीटरपद सलग तिसऱ्या वर्षी मिळाले होते... म्हणजे रूबाबात अजून भर.. बाई वर्गात नसल्या की वर्गाला शिस्तीत ठेवायचे काम माझे.. जी मुले ऐकणार नाहीत त्यांची नावं नमूद करून बाईंना द्यायची.. माझा वर्गात पहिला नंबर वगैरे नसायचा. पण मी गीतमंचात असल्याने मला बाई जरा जास्त ओळखत होत्या.

स्वतःला म्हणजे गुड्डीतली जया भादुरीच समजायचे मी. या कारणामुळे वर्ग मला जरा घाबरूनच असायचा..

माझ्याकडे कोणासाठी दया माया नव्हती.. ऐकलं नाही की लिही नाव.. ऐकलं नाही की लिही नाव.. मग मैत्रिणधर्म पण कळायचं नाही तेव्हा..

त्यादिवशीही असंच झालं.. नवीन मुलं (फुटलेली शिंगं बाहेर न काढता) शांत बसली होती.. पण जुने(बड्या शिंगांचे) पंटरलोक मस्ती करू लागलीत.. एकदा दोनदा सांगितलं. पण गाढवापुढे वाचली........! शेवटी चालवलंच पेन रपारप... आनंद, राजेंद्र, शुभम, मितेश, राकेश..! औफ़्फ़! राकेश..! नाही नाही.. तो नवीन आहे.. हीच आगाऊ मुलं त्याला बिघडवताएत.. तसा तो चांगला आहे.. हं !... खोडलं..

तेवढ्यात बाई आल्या.. आपली पर्स टेबलावर ठेवत त्या खुर्चीत खुर्चीत बसल्या आणि म्हणाल्या- "एकमेकांच्या मित्रमैत्रिणींनो आणि माझ्या विद्यार्थ्यांनो..!"

हे वाक्य ऐकून सगळा वर्ग पोट धरून हसू लागला. बाईंनी पण गालावरची खळी फुलवत थोडं हसून घेतलं. मग त्या पुढे म्हणाल्या,"शाळा नुकतीच सुरु झाली आहे. तर पुढच्या वर्षभर कराव्या लागणाऱ्या अभ्यासाची सुरुवात आत्ता लगेच करणं मला काही पटत नाही. म्हणून आपण आजच्या तासाला काहीतरी वेगळं करू.

अभ्यास नाही असं खुद्द बाईंनीच जाहीर केल्याने मुलं चेकाळली आणि मग एकच कलकलाट सुरू झाला.

"बाई गाण्याच्या भेंड्या खेळू"

"नाही..बाई दमशेराज खेळू"

"बाई ग्राउंड वर न्या नं" प्रत्येकाच्या सुपीक डोक्यातून वेगवेगळया कल्पना बाहेर येऊ लागल्या.

"वाटलंच..खेळाशिवाय तर काही सुचणारच नाही. ते काही नाही. आपण असं करू कि प्रत्येकाने एक म्हण सांगायची आणि तिचा अर्थ पण समजावून सांगायचा."

बहुमताने हा खेळ मान्य झाला आणि खेळाला सुरुवात झाली. खेळ खूप रंगला आणि सगळ्यांना मज्जाही येत होती. मग शेवटी म्हणी रिपीट होऊ लागल्यावर बाईंनी खेळ थांबवला.

एव्हाना नावांचा कागद मी त्यांना दिलाच नव्हता त्यामुळे बरेच जण सुखावले होते. पण माझ्या लक्षात होतं. बाई परत खुर्चीत बसायला गेल्या त्यांच्यासमोर कागद धरला- - -

"बाई, हा घ्या कागद..---ही मुलं ऐकत नव्हती"

बाई- "ही तर न ऐकणारी कार्टी आहेत. कोण कोण आहे. चला पुढे या तर. सगळी मस्ती काढते एकेकाची. राजेंद्र आनंद शुभम् मितेश. आणि हा कोण.. र.. र.. राकेश... याचं नाव खोडलेलं दिसतंय. काय कारण??"

मी- "अं..बाई..तो नव्हता बोलत.. हीच पोरं त्याला त्रास देत होती.."

आनंद- आम्ही?? विचार त्याला... ए काय त्रास दिला रे तुला राक्या.. तोंड उघड की बैला..

बाई- आनंद, ही काय भाषा तुझी..? पान-टपरी वाटली का ही शाळा? काय गं शारदा, काय झालं नेमकं?

मी- बाई तो नव्हताच बोलत.. माझा गैरसमज झाला होता..

(राकेश आपला कुतूहलाने आणि गोंधळलेल्या नजरेने माझ्याकडे पहात होता)

मी- जा तू राकेश.

शुभम्- जा!! जा?? नवीन मुलाची इतकी बाजू.. आम्हाला कधी माफ नाही केलंस ते..

मी- तोंड सांभाळ रे ए.. शुंभा..

तेवढ्यात घंटा वाजली

बाई- बरं, उद्या बघते तुम्हाला.. आता दंगा नका करू..

बाई गेल्या.. मुलंही जागेवर गेली..

आनंद- राक्या.. क्या बात है यार.. तुला तर पाठराखीण मिळाली आल्या आल्या..

पण राकेश मात्र गप्प.. कदाचित काय रिॲक्ट करावं ते समजले नसेल त्याला. पण आनंदचं ते 'पाठराखिण' वालं वाक्य माझ्या डोक्यात बसलं. खरंतर राकेश बोलला होता.. मग मी का खोडलं त्याचं नाव?

माझंच मन मला समजावु लागलं- अगं तो नवीन आहे..

मी- हो मग? नवीन असणाऱ्यांकडे पास असतो का बोलायचा..!!

तेवढ्यात राकेश आला..

राकेश-(मला हात मिळवत) हेय! शारू! थेंक्स यार.. यापुढे मी त्या अन्ड्याच्या नादाला लागणारच नाही.. --कारण पुढच्यावेळेला काही तू परत खोडणार नाही नं नाव...!

मी एक वेणी पुढे घेत हळुच म्हणाले- "असं काही नाही"

तो- काय म्हणालीस?

मी वेणीला हिसका देत जोरात मागे टाकुन जरा सावरतच म्हणाले-

"अं अं... अरे म्हणजे तु नवीन आहेस नं.. मुलांची ओळख नाही म्हणून..

तो- हो नं.. बरं चल..

मी- कुठे ?

तो- अगं, चल म्हणजे येतो, म्हणजे जातो.. टिफीन खायचाय.. जाम भुक लागलीये यार..

मी- हं !..

राकेश गेला.. पण माझ्या डोक्यात त्याचं बोलणं रिपीट होत राहिलं... 'शारु'.. माझं पेटनेम कुणाच्याच तोंडून आजवर एवढं भावलं नव्हतं.. तो जाईपर्यंत त्याच्यावरून डोळे हलतच नव्हते..

'काय ऐटीत चालतो नं हा'- मनात आवाज आला..

आणि मला एकदम शुद्ध आली.. मी माझ्याच मनाला झापलं- काहीच्या काही पण बोलु नको गं तू......!

घंटा वाजली.. पुढचा तास सुरू झाला.. पण माझ्या मनात अजूनही त्याच्या आवाजातलं 'शारु' घुमत होतं.. हातात त्याने केलेलं शेकहॅन्ड जाणवत होतं.. डोळयांसमोर त्याचे तपकिरी डोळे फिरत होते..

एक मिनीट.. तपकिरी डोळे..!! त प कि री डो ळे !!!

एवढं ऑबझर्व्ह केलंस तू..! कमालेय..!- मन म्हणालं..

म..म..म्हणजे..बोलताना माणूस डोळयांतच बघतो ना..! तू गप्पच बस गं... बावळट..

मी परत मनाला झापलं.. त्या दिवशी पुर्ण दिवस माझं लक्ष राकेशकडे होतं.. कसा डौलात बसतो... केसांतून हात फिरवताना काय भारी दिसतो.. एरवीही छानच दिसतो म्हणा.. (एरव्ही म्हणजे? याच तर वर्षी शाळेत आला होता) पण रहाणीमान काय मस्तंय.. आणि पहिल्याच भेटीत किती मोकळं आणि स्पष्टं बोलला नाही तो? जणू वर्षानुवर्ष ओळखतो आम्ही एकमेकांना.. खरंच इतकी वर्ष कुठे होता हा??!

'काय.. आवडला ना?' -मन.

'एऽऽ !! तुऽऽऽऽऽऽऽऽ नाऽऽऽऽऽऽ...! जास्त चरबी चढलीय का आज तुला?'- मी परत झापलं मनाला..

तोच गोडसे सर आले नोटीस घेऊन..

"कोणाकोणाला टेक्निकल विषय घ्यायचाय?"- सर.

राकेश धाडकन उभा राहिला..

"सर मलाऽऽऽऽ"

किती मार्क्स होते ६वीत?

“सर, ८७.५५..”

“वाह.. उद्या मार्कशीट घेऊन ये आणि हा अर्ज भरून आण..अजून कोणी इच्छुक?"

तेवढ्यात आनंद मागून हळुच मला म्हणाला-

"ए शारदा, तुला पण जायचं असेन ना आता??"

मी त्याच्याकडे फुल खुन्नस भरून पाहिलं..

सर गेले.. असाच दिवस गेला.. शाळा सुटली.. माझ्या मनात ते 'शारु' अजूनपण घुमत होतं..

तेवढ्यात परत ऐकु आलं..

शारु... शाऽऽऽऽरु..!

'ए आला राकेश..' – मन

मी चमकुन मागे बघितलं तर...!

आनंद ओरडत होता..

'अन्ड्या..शिस्तीत रहा..नाहीतर उद्या बाईंना नाव सांगेन हं..'

जा गं.. तू आमचीच नावं सांग.."

गेला आनंद...

आनंद गेला ??? असं कसं बोलला तो..? आणि मी कसं ऐकून घेतलं..!!

असा विचार करत मनातल्या 'शारु'ला घेऊन मी घरी निघाले..

दुसऱ्या दिवशी शाळेत..

बाई- आनंद, राजेंद्र, शुभम्, मितेश.. चला कालचा प्रसाद घ्यायला या..

शुभम्- आणि राकेश..?

(मला भिती वाटली)

बाई- "गोडसे सरांकडून कळलं राकेश ने टेक्नीकल निवडलंय... छान गुण मिळाले राकेश तुला ६वीत.." (त्याची स्तुती ऐकून मला खूप आनंद झाला)

"तुम्हीच रे ते निर्लज्ज..चला हात पुढे करा.."

आनंदने माझ्याकडे पाहिलं.. मला हसु आवरत नव्हतं.. मनात आनंदाच्या उकळया फुटत होत्या)

तेवढ्यात शिपाईकाका आले.. "राकेश कदम. आजपासून तुझा वर्ग 'क'..टेक्नीकल ग्रुप..चल"

(मनातल्या उकळया बंद..आनंदने परत माझ्याकडे पाहिलं..यावेळी मात्र तो त्याच्या चेहऱ्यावर भारी 'आनंद' दिसत होता.. 'आसुरी आनंद' .. मी परत एक खुन्नशी नजर त्याला दिली)

राकेशने दप्तर भरलं.. आणि निघाला.. जाता जाता मला 'बाय शारू' असंही म्हणून गेला..

आजचा दिवस कसा जाणार?

'ए खरंच गेला तो!' –मन

'हो हो गेला.. आता कितीवेळ तेच..' -मी..

मधल्या सुट्टीत आनंद मला म्हणाला- ए शारे, त्या राक्याला शिक्षा झाली बघ!

क्षणभर माझा ठोकाच चुकला.. पण नंतर लक्षात आलं की आनंद कधीच सुधरणार नाही..

आणि पुढील बरेच दिवस मी 'तिथे राकेश ला कोणी पाठराखिण मिळाली असेल का? हाच विचार करत होते..



# घुसमट

राकेश क वर्गात गेला आणि त्या वर्गाशी माझं सख्य अजूनच वाढलं.. शाळेच्या स्टेजच्या मागे इंग्रजीतल्या एल आकारात असलेल्या इमारतीत आमचे सातवीचे वर्ग होते. त्यात एल'च्या मधल्या कॉर्नरचा असणारा वर्ग हा क वर्ग होता. त्या उजव्या बाजूला ब आणि अ वर्ग आणि डाव्या बाजूला ड आणि ई वर्ग. माझा आणि क वर्ग यात ब वर्ग माझ्या दुश्मनासारखा बांधलाय असं वाटायचं. पण तिथून बाहेर पडण्याचा जिना हा क वर्गासमोरूनच असल्याने 'बांधकाम करताना नक्कीच "माझा" विचार केलाय' असंही वाटायचं.. त्यात मी होते मॉनिटर.. म्हणजे बरीचशी कामं ही मला करावी लागत.. त्यासाठी शाळेच्या मुख्य इमारतीत सारखं सारखं जावं लागायचं म्हणजे स्टेजच्या पलिकडे. आणि असं असेल तर..! येस्स..क वर्गासमोरचा जिना वापरावा लागणार! सगळ्या गोष्टी किती अनुकुल घडत होत्या.. मी तर वर्गात वाटच पहात बसायचे की कधी बाई मला काम सांगतील आणि कधी मी बाहेर जाईन.. कारण जाता जाता मला क वर्गाचे हालहवाल दिसायचे.. आणि त्या ६०-७० मुलांच्या गर्दीत राकेशला शोधण्यासाठी मी मुद्दाम हळु हळु चालायचे.

"दिसला का गं?" - मन

"क् कोण ?" -मी

"अगं राकेश! तू कोणाला शोधणारेस अजून??"-मन

"मी तर प्राजक्ता दिसतेय का ते बघत होते."

"हो?? बरं.. पण.. दिसला का सांग नं"-मन

"गप गं माझी आई.." -मी..

जिन्यावरून येताना जाताना बऱ्याच वेळा माझं आणि माझ्या मनाचं असं युद्ध व्हायचं, जे काही नवं नव्हतं. तसा राकेश मधल्या सुट्टीत, शाळेआधी किंवा नंतर वगैरे भेटायचा पण का कोणास ठाऊक मला त्याची मैत्री खूप हवीहवीशी वाटायची.

माझ्या वर्गातला नालायक आनंदही माझा खूप चांगला मित्र होता. पण राकेशच्या बाबतीत. . .काहीतरी वेगळं घडत होतं हे नक्की.. आजकाल आमच्या खिडकी शेजारचं खुरटलेलं झाड सुद्धा मला पालवीने बहरल्यागत वाटायचं. मी माझा युनिफॉर्म मळला नसेल तरी रोज धुवायचे आणि इस्त्री करून घालायचे. बूटही अगदी चकाचक पुसून जायचे कारण राकेशसुद्धा असाच एकदम अप टु डेट राहायचा. हल्ली बऱ्याचदा मी क वर्गातल्या मैत्रिणींसोबत डबा खायला जायचे. त्याच निमित्ताने चार मिनीटं जास्त नजर ठेवता येईल राकेशवर! तिथेही डबा खाताना माझे लक्ष मैत्रिणींच्या गप्पा टप्पांत नसायचंच जास्त.. मग मी आपला स्वत:हून एखादा विषय काढावा आणि वळवत वळवत तो येन तेन केन प्रकारे राकेशवर न्यावा असं चालायचं.. म्हणजे फार नाही.. उगाच कुणाला वेगळाच संशय येणार नाही नं याची खातरजमा करूनच मी बोलायचे. राकेश गेल्याच्या दुसऱ्याच दिवशी 'मला काहीच माहित नाही' अश्या अविर्भावात मी प्राजक्ताला विचारलं- "ए तुमच्या वर्गात एक नवीन मुलगा आलाय म्हणे? फार हुशारेय असंही ऐकलंय!"

"हो गं हो, राकेश कदम नावाचा.. दुसऱ्या बेंचवर बसतो. अतुल शेजारी.. पटापट उत्तरं देतो सगळया प्रश्नांची.."

"अरे व्वा ! हुशारेय म्हणजे खरंच.. मैत्री करायला हवी !"

"कित्ती खोटं बोलते गं ब्बाई ! जसं काही माहितच नाही अशीच करतेय.."-मन

"गप गं.. तुला काय..?"- मी.

प्राजक्ता ही माझी कॉरस्पॉंडंट होती क वर्गातली... इत्थंभूत बातम्या द्यायची... आणि मलाही बरंच काही विचारता यायचं..

प्राजक्ताची वाट बघत मी शाळेच्या गेटजवळ रेंगाळायची. पण कोणाला कळणार नाही असं. तिथे एक चिंचा-बोरंवाला असे. आणि एक फ़ुलवाली. मी उगाच “हे कसं

दिलं- ते कसं दिलं" करत तिथे वेळ काढायची. त्यातून सोनचाफ़्याचा किंवा मोगऱ्याचा वास मनात साठवत रहायची. पण डोळयांचे कोपरे प्राजक्ताला शोधत असायचे. आणि प्राजक्ता आल्यावर जसं काही महत्त्वाचं काम संपल्यासारखी वळायची आणि अचानक भेटल्यासारखी प्राजक्ताला "हाय!" करायची. आणि प्राजक्ता आल्यावर पुन्हा तिकडेच गप्पा मारत रेंगाळायची... ते कां बरं?

अशीच एकदा शाळा भरायच्या आधी गेटजवळ मी प्राजक्ताशी बोलत होते. नेहमी प्रमाणे मी फिरवून फिरवून विषय राकेशवर आणला.. आणि प्राजक्ता म्हणाली, "तुला आवडतो ना तो?"

"!!!!!!!!"

धप्प...

माझ्या मनात एकदम गरमागरम सुगंधी वीज चमकल्यासारखं झालं.

हे माझ्यासाठी खूप अनपेक्षित होतं. आत्तापर्यंत फक्त माझं मन असं विचारायचं. पण आज एका दुसऱ्या व्यक्तीने हे विचारलं होतं. मी माझ्या मनाला गप्प करु शकत होते पण इतरांना ?

मला तो आवडत होता? नाही नाही.. ही गोष्ट काही केल्या मनाला पटत नव्हती. असं काहीतरी आहे हे कळत तर होतं पण मान्य केलं जातं नव्हतं. 'मला फक्त त्याची पर्सनेलिटी आवडते' ह्या वाक्यावर काही भागत नव्हतं. ज्याला त्याला स्पष्ट कबुली हवी होती. तेवढ्यात बाजूला उभा असलेला आनंद ओरडला-

'आवडतो म्हणजे काय? ही लाईन मारते त्याच्यावर..म्हणून तो वर्ग सोडून गेला"

मी सुन्न झाले..लाईन मारतेय??? तो आवडतो हेच पचवायला कठीण होतं आणि लाईन मारणं हे तर कल्पनेपलीकडचं होतं.. आनंदची ही पान-टपरी भाषा मनात घर करून गेली. डोळे टचकन भरून आले.

किती फरक असतो मुलांच्या आणि मुलींच्या बोलण्यात! मी तसंच कसंतरी वर्गात गेले. आज जिन्यावरून जाताना अजिबात उत्सुकता वाटत नव्हती. क वर्गाकडे नजर टाकायचं अजिबात मन नव्हतं.. मी वर्गात बाकावर जाऊन शांत बसुन राहीले.

कोणाला कळणार नाही असं डोळयातलं पाणी मनगटाने टिपलं. पण मनात विचारांचं काहूर माजलं होतं.

तोच आनंद आला, म्हणाला-

"ए शारु सॉरी यार.. मला तसं नव्हतं म्हणायचं.. मी फक्त चिडवत होतो.. म्हणजे असंच.. प्लीज ना. सॉरी ना.."

मी त्याला “इट्स ओके” म्हणून टाळलं.. पण मला वाईट वाटलं होतं हे आनंदला आणि मलाही चांगलं ठाऊक होतं.. प्रार्थना झाली, तास सुरु झाले. पण माझे डोळे अधुन मधून ओले होतच होते. मुड पार कुठच्या कुठे उडून गेला होता. मनात आवडणं आणि लाईन मारणं या शब्दांची आपापसात मारामारी चालु होती.. पण या सगळयामुळे माझी फार कोंडमारी होत होती.

डोळयांतल्या धारा आणि मनातला मारा काही थांबत नव्हता... आज वाटतं की त्या वेळी मी जर वयाने थोडी मोठी, थोडी समजूतदार, थोडी परिपक्व असते तर..



# दुर्लक्ष

आता मात्र माझाच दृष्टीकोन बदलला होता. मला स्वत:चीच लाज वाटायची. ज्या गोष्टीला मी अतिशय निरागसतेने बघायचे तिला नुसता आनंदच नाही तर माझ्याही मैत्रिणीनेही नात्याचं नाव दिलं होतं. सारखं 'मी फार घोर पाप केलंय' असं वाटायचं. दरम्यान बाईंनी कुठलं काम सांगितलं की जीवावर यायचं. पहिली नजर आनंदकडे वळायची. तो डोळे मिचकावत जे काही हावभाव द्यायचा त्यातून हे स्पष्ट कळायचं की अंड्या मला चिडवतोय. मग मीही बाहेर पडल्यावर नेहमीच्या गतीपेक्षा जोरात चालायचे. जणु क वर्ग यायलाच नको असं वाटायचं. ही बिल्डिंग अशी बांधणाऱ्याचा राग यायचा. कारण क वर्गावरून न जाता ऑफ़िसमध्ये जायचा काही मार्गच नव्हता. क वर्गाजवळ आलं की सगळे १२० डोळे आपल्यालाच न्याहाळताहेत आणि हात तोंडावर धरून सूचक हसताताहेत असं वाटायचं. प्राजक्ताच्या एका सरळ प्रश्नाला आनंदने दिलेल्या वाकड्या प्रतिक्रियेचे हे सारे परीणाम होते.

हळूहळू मी परत जुन्या जगात आले.  परत पुर्वीसारखा माझ्याच वर्गातल्या मैत्रिणीसोबत डबा खाऊ लागले. राकेश विषयी बोलणं जाणून बुजुन टाळु लागले. विषय तिकडे जायला लागला तर, अगदी क वर्गाचा विषय निघाला तरी, विषय दुसरीकडे वळवायला लागले.

दोन गोष्टी मात्र कधीच थांबल्या नाहीत त्या म्हणजे आनंदचं चिडवणं आणि माझ्या मनाचं युद्ध!

"तुला काय करायचंय आनंद आणि बाकीचे काय म्हणताएत त्याचं ??" मी

"जा एक सणसणीत लगावून दे त्या अंड्याच्या कानाखाली" दुसरी मी

"हा काय कमी पिडतो का मुलींना.. जा त्याच्या जुन्या दोन 'लाईनींची' नावं ओरड, गप्प बसेल आपोआप" तिसरी मी

अशी अनेक संतप्त विधानं माझं मन करायचं. पण आताशा मनाशी भांडायची हिम्मत राहीली नव्हती. अशी आणीबाणीची परिस्थिती असताना शाळेचं गॅदरिंग येऊन ठेपलं. वाटलं, चला तेवढाच विरंगुळा या साऱ्यातून!

पण हा विरंगुळा फार महागात पडणारे याची पुसटशी देखील जाणीव मला नव्हती..

"सालाबाद प्रमाणे या वर्षीच्या स्नेहसंमेलनाची आखणी करायची आहे. प्रत्येक वर्गाने मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपल्या कलागुणांना सादर करावे. आपापले कार्यक्रम ठरवून नावांची यादी श्री.पाठक सर यांचेकडे दिनांक १० जानेवारीच्या आधी द्यावी."

"हं.. कोणकोण सहभागी होणारेय..शारदाकडे नावं द्या.. इतर वर्गातल्या मुलामुलींशी मिळून केलं तरी चालतंय. शारदा, यादी आधी मला दाखव"

- बाईंनी गॅदरींगची सुचना वाचली आणि एकदाचं लक्ष दुसऱ्या विषयावर वळलं.. स्नेहसंमेलन हा माझ्यासाठी फार जिव्हाळयाचा विषय होता.. अंगात चैतन्य सळसळायचं.. कोणाचा नाच कोणाचं भाषण, कुणाचं गाणं, कोणाचं नाटक, कोणाचा सत्कार, बक्षीसवितरण, आदर्श विद्यार्थी, आदर्श वर्ग, आदर्श खेळाडु, हस्तलिखीत प्रकाशन कित्ती साऱ्या रम्य गोष्टी असतात गॅदरिंगच्या दिवशी.. आणि त्याआधीचे दोन रम्य फुलपाखरी आठवडे. तयारी. धावपळ. नव्या नव्या आयडिया. नवे नवे मित्र. नव्या नव्या ओळखी.. आणि सगळयात मोठं... आपल्यातल्याच लपून बसलेल्या नव्यानव्या गुणांची ओळख.

शिक्षकांसकट विद्यार्थीही वर्गाबाहेर.. या दिवसांत वर्गांमधे दंगा झाला तरी कोणी ओरडायचं नाही.. मुख्य इमारतीच्या खाली असलेल्या तळघरातल्या वर्गांमधे सगळी प्रॅक्टीस चालायची. एका वर्गात नाचाची, एकात गाण्याची, एखाद्यात नाटकाची तालीम तर एखाद्यात कार्यक्रमांचा क्रम ठरवणारी शिक्षक मंडळी बसलेली असायची.. मधे मुलं दारं लावून प्रॅक्टीस करायची आणि बाकीचे 'आगाऊ प्रेक्षक' म्हणजे सहभाग न घेतलेले विद्यार्थी मिळेल तिथून हे सगळं बघण्याचा प्रयत्न करीत.. मग एखाद्याच्या खांद्यावर उभं राहून तर कधी कुठल्यातरी खिडकीतून.. गुरव बाई फार ओरडायच्या या 'अधीर' नमुन्यांना.. पण तेवढंच हसायच्याही त्यांच्यावर.. म्हणायच्या- "मुली नाचत असलेल्या वर्गासमोर भारी गर्दी करतात हो ही रोमिओपंथी मंडळी !". त्यांच्या या तक्रारीत एक लाडिक भाव असायचा. आपण वाढवत असलेल्या रोपट्याला फ़ुलं येत असल्याचा.

आणि मग एकच हंशा पिकायचा.

इतर दिवसांत फारसं वापरलं न जाणारं तळघर गॅदरींगच्या वेळी मात्र जिंवत झाल्यागत वाटायचं. माधव हा शिपाईदादा वाजवणाऱ्या घंटेची तर कुणाला शुद्धच नसे.. कारण प्रत्येक तास हा जवळ जवळ मधली सुट्टीच असायचा! तरीही माधवदादा अगदी प्रामाणिकपणे घंटा द्यायचा. तो जेवढा गरीब होता त्याहून जास्त प्रेमळ होता.

मी गीतमंचात होते आणि पेटी वाजवायचे त्यामुळे सकाळची प्रार्थनेच्या वेळेला माधवदादा माझा मदतनीस असायचा. ऑफिसच्या समोर टांगलेल्या घंटेखाली माधव दादा एखाद्या खांबासारखा उभा असायचा. गडद आकाशी शर्ट आणि खाकी पॅंट अश्या नेहमीच्या स्वच्छ पेहरावात माधव दादा येणाऱ्या जाणाऱ्या शिक्षकांना गुड मॉर्निंग, गुड आफ्टरनुन वगैरे ठोकायचा. शिक्षकांनाच काय! विद्यार्थ्यांनासुद्धा तो तेवढ्याच आदराने वागवायचा. प्रॅक्टिसच्या वेळी मी यायच्या आधीच टेबलवर पेटी मांडून ठेवायचा.. साफसुफ करून ठेवायचा.. कधीकधी कुतुहलाने वाजवायचाही! म्हणजे हे मला त्याने कधी सांगितलं नाही पण 'वाजवून झाल्यावर स्टॉपर बंद करायचे असतात' हे त्याला माहित नव्हतं. मी यायच्या आत बरोबर तो बाजूला जाऊन उभं रहायचा. पण तो मला बऱ्याचदा म्हणायचा, "बेबीताई मला बी शिकीव

ना हे कसं वाजवायचं त्ये.. मला लै आवडतं बघ.." मग मी पण त्याला एक दोन एक दोन ओळी शिकवायचे.

आता पण गॅदरींगच्या प्रॅक्टीसला त्याने बिगीबिगी पेटी आणून दिली आणि बाजूला जाऊन उभा राहिला. पेटीवर मी, तबल्यावर पाठक सर, आणि गाणाऱ्या मुली, असा आमचा ऑर्केस्ट्राच तयार व्हायचा. मज्जा यायची. अशीच एकदा तळघरात आमची गाण्याची प्रॅक्टीस सुरु असताना राकेश आला.

मी गोंधळले, घाबरले. "हा का आला इथे??"

चट्कन आजुबाजूला कुठे आनंद नाही नं हे पाहिलं..

"ओह राकेश आला.. ए केस नीट कर पटकन" - मन म्हणालं..

"सर, मला नाटक करायचंय. माझ्याकडे स्क्रिप्ट आहे एक. मस्त विनोदी. “टॉम आणि टॉमी”. हे पहा. फक्त सोबत कुणीतरी लागेल. कारण नाटकात दोन पात्रं आहेत."

पाठक सरांनी नाटकावर एक नजर टाकली. तसं मीही दोन तीन वेळा नाटक केलं होतं आणि त्याला बक्षिसही मिळालं होतं. माझा अभिनय तसा बरा होता असं मैत्रिणी, बाई, दादा सगळे म्हणत. पण पेटीच्या नादात तिकडे लक्ष देत नव्हते. आज मात्र राकेशच्या नाटकासाठी सरांनी माझं नाव सुचवावं अशी माझी खूप इच्छा होती.

"अगं सरांची वाट पाहु नको.. स्वत:च सांग मी करते असं" -मन

"नको.. इतरांना संशय येईल" –मी

“कर... कर हात वर !” –मन

“नको नको!” – मी

“अरे कर यार! म्हणणारे दोन्हीकडून म्हणतात” – मन

“ अरे गप बस ना येडपट. सरांना स्वतः म्हणू दे. नाही तर सगळे (म्हणजे तो अंड्या आणि प्राजक्ता) मला परत बोलतील.” - मी

"हं चोराच्या मनात चांदणं म्हणतात ते हेच.. आणि म्हणे राकेश चांगला मित्र आहे.." -मन..

आमचा संवाद चालु होता तोवर सरांनी राकेशला मनिषा परांजपेचं नाव सुचवलं. माझी आतडी पिळवटुन निघाली. राकेश सोबत काम करण्याची संधी त्या मनिषाने काहीही न करता कशी हिरावून नेली हे मला चिडवून गेलं.

"बघ बघ! सांगत होते स्वत: भाग घे.. ऐकत नाही अजिबात.. मुर्ख" -मन

त्यानंतर थोडा वेळ राकेश तिथेच थांबला. मी अजून ऐटीत उभी राहिले. चेहऱ्यावर एका तरबेज गवैय्यासारखे हावभाव आणण्याचा प्रयत्न केला.. 'अगं ओव्हरअ‍ॅक्टींग करु नको. इंप्रेशन पडायच्या ऐवजी तूच पडशील त्याच्या मनातून." -मन

तो दिवस खूप चांगला गेला.  राकेश पुढे रोज प्रॅक्टीस चालु असताना येऊ लागला. आमच्या गाण्यानंतर त्यांचीच तालिम असायची. मनिषा आणि राकेशला एकत्र पाहून मनात ज्वालामुखी फुटायचा.

आणि मग "हे कसे माझ्याच मूर्खपणाचे परिणाम आहेत" हे माझं मन मला सांगायचं.

असेच दिवस जात राहिले.

तालिमी होत राहिल्या.

गॅदरिंगचा दिवस जवळ जवळ येऊ लागला.

प्रत्येकाचा उत्साह अजून वाढू लागला.

कामांना गती आली.

कार्यक्रमपत्रिका तयार झाली.

स्वयंसेवक तयार झाले.

स्टेज आणि शाळा सजली.

सगळं सगळं तयार झालं.

आणि आता सगळे  फक्त गॅदरींगच्या दिवसाची वाट पाहत होतं.

अखेर तो दिवस उजाडला. व्हेलवेटच्या कापडाने सज्ज झालेला स्टेज, त्यासमोर साफसुफ केलेलं आणि सडा मारलेलं ग्राउंड, पहिल्या पावसासारखा धुंद सुगंध, लाल कार्पेट, त्याबाजूला रांगेत मांडलेल्या खुर्च्या, बाजूला लाल बिल्ले लाऊन शिस्तीत उभे असलेले स्वयंसेवक, झिरमिळया आणि पताकांनी नव्या नवरीसारखी नटलेली शाळा, विविध प्रकारच्या फुलांनी सजलेलं प्रवेशद्वार, लिलीचा वास, पुष्पगुच्छ, आणि मुख्य पाहुण्यांच्या स्वागतासाठी नवीन साड्या नेसून तयार असलेल्या शिक्षिका...सगळं इतकं इतकं रम्य आणि उत्साही दिसत होतं की कुणाची नजर लागावी!

हळुहळु विद्यार्थी आले, मग पालक आले..एक एक करून खुर्च्या भरु लागल्या आणि शेवटी कार्यक्रमाला सुरुवात झाली..टाळयांच्या कडकडाटात पाहुण्यांचं स्वागत झालं, आमचं स्वागतगीत झालं, प्रतिमापुजन झालं. प्रत्येकाचे लांबलच्चक “दोन दोन” शब्द बोलुन झाले. हस्तलिखिताचं प्रकाशन झालं.

आणि अचानक लाईट्स ऑफ ! गर्द काळोख. प्रेक्षकांमधे एकच कुजबुज सुरु झाली. मधेच काही टवाळ पोरं ओरडली- 'अरे फ्युज गेला रे..एकमेकांना त्रास देऊ नका" सगळयांना वाटलं- कार्यक्रमाचा बट्ट्याबोळ झालाय.

मी तर कावरीबावरी झाले. एकटीच होते स्टेजच्या मागे. म्हणजे गर्दी खूप होती. पण माझं असं कोणीच नव्हतं. राकेश कुठंय? जवळपास असेल? त्या विचारानेच माझं ऊर धप धप करायला लागलं. राकेश अजून भेटलाच नव्हता. त्याला न भेटताच आज जावं लागणार. अशा काळोखात थांबणं योग्य नव्हतं. बाहेर जाऊन आई आणि दादाला भेटावं. आई म्हणेल घरी चला.

चला.. आता आपापल्या घरी निघा..

तेवढ्यात..

तेवढ्यात माईकवरून अनाऊंसमेंट झाली.

"मायबाप प्रेक्षकहो, ज्या क्षणाची तुम्ही अगदी आतुरतेने वाट पहात होतात तो क्षण आलाय. आता तुमच्यासमोर विविध मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करतील आपल्या टिळक विद्यालयाचे विद्यार्थी......"

"ओह ! हा पब्लीसीटी स्टंट होता तर ! लाईट आहेत म्हणजे.." -प्रेक्षक परत कुजबुजू लागलीत. आणि टाळ्यांचा पाऊस पडू लागला.. काय मी ! त्या एका सेकंदात किती विचार करून बसले होते!

प्रत्येकजण आपापला नाच, नाटक, भाषण अगदी जोशाने देत होतं.. आम्ही आपले बॅक स्टेजवर एकेकाचे अवतार नीट करत होतो. कुणाचा मेकअप, कुणाचा ड्रेस.. कुणाची ओढणी, कुणाचे केस.. स्टेजच्या समोरचा प्रेक्षकांचा भाग जेवढा रंगांनी नटला होता तेवढाच बॅकस्टेज सुद्धा रंगला होता.. चमचम चमचम.. जणु रंगपेटीतून बाहेर येऊन सगळे रंग नाचतच होते. सगळीकडे! एक माधव दादा होता फक्त जो त्याच्या नेहमीच्याच गणवेशात होता. तरीही त्याच्या चेहऱ्यावर प्रचंड समाधान होतं. कार्यक्रम सुरु व्हायच्या आधी तो मला येऊन म्हणाला होतं "बेबी ताई, म्या कसा दिसू रहिलो? कालच नवीन शिवून आनलय ह्ये कापड ग्यादरिंग साठी..". माझ्या डोळ्यात नकळत पाणीच आलं होतं..

तेवढ्यात राकेश आला.. "हेय शारु..." मी क्षणभर सातवीच्या पहिल्या दोन तीन दिवसांत गेले.. नकळत चेहऱ्यावर हसू आलं.

"ए माझा कोट नीट दिसतोय ना.. नाहीतर नाटक सोडून लोकं माझ्यावरच हसतील "- राकेश

"नाही रे..मस्तं दिसतोयस तु..छान एकदम."- माझ्या नव्या ब्रेसलॅटशी चाळा करत मी म्हटलं खरं. पण ऊर धाड धाड धपधपायला लागलं. घसा तर कोरडा झाला. गुलाबी वॉटरबॅगेतलं पाणी पिताना तेही अंगावर सांडतं की काय इतकी हाताची थरथर होत होती. म्हणून मी बाटली सरळ तोंडाला लावली.

"खरंच? मनापासून सांगतेय ना? की असंच टर उडवतेयस??" माझी पाण्याची बाटली ओढून घेत राकेश म्हणाला आणि तोंडाला लावून घटाघटा प्याला. मी ते वाक्य कित्ती मनापासून बोलले होते याचा राकेशला ठावठिकाणाच नव्हता.

मी राकेशला एक छानसा स्माईल दिलं

"ए तुझा ड्रेस पण खूप छान आहे हं ! तुला माहितीये, मला बदामी रंग फार आवडतो.. आणि . . . . . तुझ्यावर तो उठून दिसतो एकदम !"

माझ्या चेहऱ्यावरचं स्माईल अजूनच खुललं..मी डोळे खाली करून एकदम कोवळं कोवळं लाजले.

तेवढ्यात पाठक सर आले.

"कदम, तयार रहा. पुढचं तुझं नाटक आहे.. ती परांजपे कुठेय? अरे जागेवर आण त्या भवानीला. कुठे भटकत असते कोण जाणे"

"आहे सर, ती इथेच बसली आहे.."- राकेश.

"ऑल द बेस्ट.. दमदार होऊन जाऊ देत" –मी... मला "ऑल द बेस्ट राकेश " असं म्हणायचं होतं. पण का कोण जाणे त्याचं नांव उच्चारणंही अवघड वाटायला लागलेलं.

"बस.. आता एवढ्या चांगल्या मैत्रिणीने विश केलंय म्हटल्यावर दमदार होणारच्च!"

राकेशचं नाटक खूप सुरेख झालं. नवीनच आलेल्या विद्यार्थ्याने स्वत:हून रुची दाखवून एवढं सुंदर नाटक बसवल्याचं सारी मंडळी कौतुक करत होती.

"खरंच राकेश अष्टपैलु आहे. म्हणूनच मला आवडतो"

"ॲट लाssssssस्ट.. मान्य केलंस की तुला तो आवडतो असं.."- मन

माझं मलाच काही कळेनासं झालं. पण खरं काहीतरी घडायचं बाकीच होतं. आता उत्सुकता होती ती आदर्श विद्यार्थी/विद्यार्थीनी पुरस्काराची. आम्ही सगळे पुढे प्रेक्षकांत जाऊन बसलो.

पाठक सर स्टेजवर आले.

" या वर्षीचा आदर्श वर्ग आहे- ६ वी ब"

एकच जल्लोष झाला..

"येऊन येऊन येणार कोण. ६ ब शिवाय आहेच कोण"

६ ब चे विद्यार्थी मोठ्याने ओरडत होते. वर्गशिक्षिकेनी आणि मॉनिटरने पुरस्कार घेतला.

"आता आजच्या दिवसाचा सर्वात मोठा क्षण..आदर्श विद्यार्थी..आणि शैक्षणिक वर्ष २००७-२००८ चा आदर्श विद्यार्थी आहे. . . . ."राकेश कदम".

पुन्हा एकच जल्लोष झाला.... कुणालाच वाटलं नव्हतं... मला तर 'आनंद पोटात माझ्या माईना' असं झालं होतं.. मी खूप जोरात टाळया वाजवल्या.. खूप जोरात...

राकेश स्टेजवर गेला. एकदम स्मार्ट दिसत होता. चालण्यात ऐट होती. पण गर्व नव्हता. त्याने सगळयांना अगदी शहाण्यासारखा वाकून नमस्कार केला. ट्रॉफी घेतली आणि सही करायला खाली उतरला.

मी देहभान विसरून त्याच्याकडेच एकटक बघत होते. त्याच्या वागण्यात किती नम्रता आहे! - मनाचे श्लोक परत सुरु झाले.

राकेश सही करून मित्रांच्या घोळक्यात दिसेनासा झाला.

"आणि आदर्श विद्यार्थिनी आहे"... “शारदा... भावे”

माझं लक्षच नव्हतं.. मी, माझं मन, माझे कान, माझे डोळे राकेशला शोधत होते. आधीच्या टाळया संपुन आता माझ्यासाठी टाळया वाजत होत्या.. पण मी अजून पहिल्याच टाळयांत होते.

"अगं शारदा.....जा की...."

"शारदा.....आय न्यु इट....कॉंगो..."

"शारदे, पार्टी..?"

"मिस शारदा. लवकर स्टेजवर या प्लीज "

"अगं जा..तुला बोलवतायत.."

मी एकदम जागी झाले.. पळत पळत स्टेजवर गेले. एका पायरीवर अडखळले. ट्रॉफी घेऊन सही करायला उतरले. माझ्या नावाच्यावरतीच त्याचं नाव होतं..आणि त्याची सही! एकदम हीरोसारखी होती.. ईश्टाईल मै! मला एकदम मोहरून आलं. स्वतःची सही आठवेच ना.

इतर पुरस्कार जाहीर झाले. सोहळा संपला. माधव दादा नेहमीसारखा चुणुक दाखवून पटपट कामं करत होता. आताशा उशीर झाला होता. साडे आठ-नऊ वाजले असतील.

पेटी तर माधव दादा ने नेली. मग मी तबला नेला.

जाता जाता मधेच राकेश भेटला.. "शारु, अगं अभिनंदन ! काय तु..मला कॉंग्रॅट्स पण नाही म्हणत. तुला माझ्या बेस्ट स्टुडंट झाल्याचा आनंद नाही झाला का?"

"अरे मी शोधलं तुला खूप..असो. अभिनंदन.."

आणि मी माझं वाक्य पुर्ण करणार तोवर.... आनंद आला..

"तुम्ही दोघांनी एकत्र पार्टी द्या.. काय राक्या"

"अरे मस्त आयडीया आहे.. सांगतोच तुला.. शारु, जाताना भेट मला"

एव्हाना मला जो कोणी भेटला तो म्हणत होता.."अरे वा शारदा, राकेश आणि तु.. आदर्श विद्यार्थी..! व्वा... म्हणजे आदर्श जोडीच की..!"

आदर्श जोडी?

हे सगळं असं होऊन बसेल याची अजिबात जाणीवच नव्हती. पण मी असं केलं तरी काय होतं?

मी पटकन तबला ठेवला आणि घाईघाईत दप्तर घेऊन निघाले.. मागून राकेश 'शारु..थांब...ए शारदा.." आवाज देत होता.. पण मी अजूनच भरभर चालायला लागले.. आणि शाळेतून सटकले.

आई आणि दादा माझ्या आधीच घरी गेल्याने मी एकटीच घरी गेले. गेल्या गेल्या आईने मला ओवाळलं.. मी कपडे बदलायला म्हणून गेले पण तो बदामी ड्रेस मला काढावासा वाटतच नव्हता.. आई ने हाक मारली म्हणून मी पटकन आटोपून जेवायला गेले पण .. ....

ड्रेस एकदाचा नीट घडी करून ठेवला..

लगेच आई ने जेवायला वाढलं.. "आई.. मी कशी दिसत होते गं आज ?"" - मी आई ला विचारला

""छान दिसत होतीस... का ग एकदम?"

"आणि माझा ड्रेस्स ? छान होता न? आता दिवाळीत ड्रेस घेऊ न मला तेव्हा बदामीच घेऊ बरं का. मला खूप आवडला हा रंग"

"अ-गं बाई जेव आधी " आई म्हणाली.

मी काही न बोलता जेवले आणि पटकन झोपायला गेले.. एरवी “हे नको, ते नको, हे चांगलंय” असं बोलणारी मी आज गप्पगप्प जेवले. नेहमी माझं लक्ष दादाच्या ताटावर असे. त्याला काही जास्तीचं दिलंय का ते... पण आज मान खाली घालून जेवले.

आईने हे हेरलं. पण "दमली असेल" असं म्हणून आईही काही बोलली नाही..

मी गादीवर पडले आणि दादा आला.."शारदा.." मी काहीच न बोलता निपचित पडून राहीले.."शारदा, तू जागीएस मला माहितीये..ऊठ.."

"प्च..थकलेय यार दादा..काय झालं बोल.."

"अभिनंदन.."

"एवढ्यासाठी उठवलंस.. भंपक आहेस रे.. तू पण... एक नंबरचा" मी परत फ़ुलाफ़ुलांचं माझं पांघरुण डोक्यावरून ओढून झोपले.

“मी पण...? आणखी कोण आहे? ...भंपक...?”

मी गप्पच... मी कूस बदलणार तोच दादा बोलला...

"नाही..हा राकेश कोण गं?" माझे डोळे ताडकन उघडले.. चेहऱ्यावरचं पांघरूण उडालं. आणि रंगही...

"राकेश? का? काय झालं?”

"अगं घाबरते काय एवढी..त्याला आदर्श विद्यार्थीचं बक्षीस मिळालं ना.. तो.. याआधी कुठे दिसला नाही"

"हं..त् त् तो..नवीनच आलाय यावर्षी..प्रचंड हुशार, आणि म् म् मनमिळाऊ आहे"

"हो!!? तुला कसं माहित?"

"अं... अं... अरे तो माझ्या.. वर्गात होता.. म्हणजे... आधी.. होता"

मी परत झोपायचा आव आणला..

"हे बघ शारदा, काय झालंय खरं खरं सांग.. त्याच्यानंतर तुझं नाव जाहीर झालं आणि मग विद्यार्थी जे काही बोलत होते ते बरोबर नाही.. काय चालुए"

"तू संशय घेतोय माझ्यावर??"

"नाही गं राणी..हे बघ..मीही शाळा केलीये.. त्याहीपेक्षा मी मुलगा आहे. म्हणून तुला तुझ्या मैत्रिणी काय म्हणतात हे खूप सौम्य झालं.. खरी गोष्ट एका मुलाकडूनच कळते.. त्याच्या बोलण्याच्या थाटावरून.."

यावरून चटकन मला आनंदचं "लाईन मारते ही त्याच्यावर" हे वाक्य आठवलं.. डोळे पुन्हा भरून आले..

दादाने हे हेरलं.. तो म्हणाला, 'हे बघ, काहीही त्रास होत असेल तर मला सांग.. उद्याच येतो शाळेत.."

मी एकदम दादाकडे पाहिलं..

दादा माझ्या मनातलं समजला.

दादा म्हणाला.. "काळजी नको करु गं... आई बाबांना नाही सांगणार.. झोप चल.."

दादाने लाईट बंद केले आणि गेला..

पण मला खूप रडु आलं..दादाला वाटत होतं की राकेशमुळे मला त्रास होतोय. पण.... तो किती चांगला मुलगा होता.. आणि माझा फक्त मित्र होता.. तरीही एवढं सगळं..."

दुसऱ्या दिवशी शाळा भरायच्या आधी मी आणि प्राजक्ता उभं होतो..आजही माझा फारसा चांगला मुड नव्हता..तेवढ्यात राकेश आला..

“हेय..शारु..काल एवढी तावातावात का निघून गेलीस..मी थांब सांगितलं होतं ना..काय झालं गं?”

राकेश आणि माझी मैत्री आता प्राजक्ता, आनंद, आणि शाळा इथपर्यंत मर्यादित राहीली नव्हती.. ही गोष्ट आता घरापर्यंत येत होती. मी साफ ठरवलं.. आजपासून

राकेशशी बोलायचं नाही. म्हणून मी मुद्दाम त्याच्यासमोर प्राजक्ताला म्हटलं, "प्राजु, जरा दुकानात चल ना. मला स्केचपेनं घ्यायची आहेत" आणि मी तिला ओढत ओढत नेलं..

ती वेळ तर मी कशीतरी निभावून नेली पण राकेशला हे खटकलं. काहीतरी चुकलंय हे त्याला कळलं असावं.. तो वेळ मिळेल तेव्हा मला येऊन भेटायचा प्रयत्न करु लागला. माझ्याशी बोलण्याचा प्रयत्न करु लागला.

आणि मी..! मी माझ्या मनाला मारून फक्त आणि फक्त त्याला टाळत राहिले. दर वेळी नवी युक्ती. दर वेळी नवा बहाणा.

पुर्वी दर्शनासाठी बहाणे शोधायचे. नुसतं त्याचं नांव कानी पडावं यासाठी. आणि आता त्याला टाळण्याचे बहाणे शोधत होते.



# दुनियादारी

पण याचा कितपत उपयोग होणार होता? गॅदरिंगच्या आधीही मी असंच काहीसं ठरवलं होतं ना? मग? काय झालं? एवढी चांगली मैत्री कारण न सांगता तोडणं आता शक्य नव्हतं... आणि कारण सांगायचंच झालं तरी काय सांगणार होते मी? की मला तुझ्या नावाने चिडवतात असं? छे..हे न पटणारं होतं.. -“लोकांना काय वाटायचं वाटू दे. आपल्याला काय”- हे त्यावरचं सहाजिक उत्तर आलं असतं..

शेवटी एक दिवस राकेशने मधल्या सुट्टीत मला गाठलं.. मी एकटेच होते.. त्यामुळे तिथून सटकण्याचं काहीच कारण नव्हतं..

"शारदा काय झालंय?"

!!! शारदा !!! ???

आज राकेश शारु असं न म्हणता शारदा म्हटला होता...म्हणजे तो नक्कीच सिरीअस होता.. "काय काम आहे?"

"काम?? आता मला तुझ्याशी बोलायला कामाची गरज असणं अवश्यक आहे??"

मी काहीच बोलले नाही.. "शारु सांग ना काय झालंय? माझं काही चुकलंय का? गॅदरींगच्या दिवसापासून तू का टाळतेयस मला??"

"काही नाही झालंय.."

"मी वेडा दिसतो का तुला?? काही नाही झालंय तर मला का टाळतेयस तु? बोलत का नाहीस नीट??"

"काही नाही झालंय यार सांगितलं ना! कळत नाही का तुला? आपल्यात डिल झाली होती का कायम बोलत राह्यचं एकमेकांशी असं?? "

"शारु धिस इज इंपॉसिबल.. नक्कीच मोठ्ठा मॅटर झालाय.. असो.. तुला नाही सांगायचं तर काय करणार मी.. मी एवढंच सांगायला आलो की तुझा दादा भेटला होता काल संध्याकाळी.. अभिनंदन वगैरे केलं.. माझा नंबर घेतला.. छान वाटलं त्याला भेटुन.. तुमच्या दोघांचा स्वभाव खूप छानेय.. पण आता तुला काय झालंय कोणास ठाउक? बघ तुला जेव्हा सांगावसं वाटेल तेव्हा सांग.. येतो"

दादा भेटला या एकाच वाक्याने मी ६०फुट उंच उडाले होते...दादा? दादा? आपला दादा? याला भेटला? काय? कुठे? कधी? कसा?? का?? आधीच डोक्याचं दही झालं होतं आता त्याचा दहीवडा होत होता..

"ए थांब, कुठे चाललास..तुला माझा दादा भेटला होता?? आणि त्याने नंबर का घेतला तुझा??"

"हो अगं..घेतला असेल सहज मित्र म्हणून..का?"

"सहज! नाही नाही....अशक्य..अजून काय बोलला तो?"

"जास्त काही नाही..संध्याकाळी व्हॉलीबॉल खेळायला येत जा म्हटला."

"अजून काय म्हणाला? नीट बोलला ना तुझ्याशी"

"शारदा काय झालंय मला सांग बरं तु.. तू खूप इनसिक्युअर दिसतेयस मला.. सांग पटकन नाहीतर मी शशी दादाला विचारेल"

"नाहीsssss.. दादाला कशाला.. आणि तसंही काहीच झालं नाहीये.. एनी वेज.. तो परत भेटला की सांग मला.. बाय"

माझ्या मनात भीती, संशय, चिंता, राग एकाच वेळी धुडगुस घालत होते.. पुर्ण दिवस मी हाच विचार करत राहीले.. दादा का भेटायला गेला त्याला.. तो त्याच्यावर वॉच ठेवतोय? आणि नंबर का घेतला?? तोही पहिल्याच भेटीत?? आणि या उदार मुलाने दिलासुद्धा!!! शुद्ध मुर्ख आहे राकेश पण... दादा, मला घरी येऊ देत फक्त..." शाळा सुटल्यावर मी उसेन बोल्टपेक्षा फास्ट धावत घरी गेले.. तिनदा चारदा बेल वाजवली.. कोणी दरवाजा उघडेपर्यंतही मला धीर नव्हता.. मी बेल बरोबर दाराची

कडीही वाजवत होते.. शेवटी दरवाजा उघडला.. दादानेच उघडला.. घरात इकडे तिकडे पाहिलं. दुसरं कोणीच नव्हतं.

"काय बावळटपणा आहे..अक्कल गहाण ठेवलीस का?"- दादा

"तू राकेश चा नंबर का घेतलास??"

"ओह, यासाठी एवढी घाईघाई चालली होती.."

" तुss राकेशचा नंबर का घे त ला सss??"

"घरात ये! बाहेर बोंबलु नको.."

"ते येतेच मी..तू का भेटलास राकेश ला ते सांग"

"अरे! माझी मर्जी!! तो इथेच जवळच राहतो.. त्यालाही बक्षीस मिळालंय.. दिसला म्हणून केलं अभिनंदन.. हे मला विचारणारी तू कोण?? त्या फेंदऱ्याने सांगितलं वाटतं तुला लगेच"

"एsss तोंड सांभाळून बोल.. राकेश नाव आहे त्याचं.."

"हो? पण तुला का एवढा राग यायला हवा? तुझा कोण लागतो का तो फ़ेंदऱ्या? हं??"

मी दादाला रापकन एक चापटी मारली.."काहीपण बोलु नको.."

"मी कालच विचारलं ना काय चालुए म्हणून? आता का चिडतेय..चोराच्या मनात चांदण्या असतात हे माहिती असेलच तुला..तुझ्या बाहेर काही भानगडी चालु असतील ना तर बंद कर आधीच सांगतोय.. सातवीत आहेस तेवढीच असल्यासारखी वाग"

"तू परत संशय घेतोयस माझ्यावर?? तुला काहीच्च कसं नाही वाटंत?? आणि भानगड!! कसं बोलतोस रे! बहीणीवर विश्वास नाही तुझा?"

मी ताडकन रुममधे गेले.. दरवाजा आपटला आणि कपडे बदलण्यासाठी कपाट उघडला तोच समोर टांगलेला कालचा ड्रेस दिसला.. का कोणास ठाऊक पण मला त्याचाही राग आला आणि मी धाड्कन कपाट बंद केलं आणि खिडकीत जाऊन रडत बसले एकटीच.. वाऱ्यावर झुलणारं समोरचं पारिजताकाचं झाड जणू माझी समजूतच काढतंय असा वाटत होतं. पण समजूत काही पटत नव्हती.

"मला नाही आवडत तो..माझं काही चक्कर वगैरे नाही चालु त्याच्यासोबत..तो जस्ट चांगला मित्र आहे माझा...का नाही समजत या लोकांना...मुला-मुलीची मैत्री फक्त मैत्री नसू शकते का! नात्याचं घाणेरडं नाव द्यायलाच हवं का?? कशाला ते? आणि समजा एखाद्या मुलीला एखादा मुलगा आवडलाच तर तो तिचा प्रश्न झाला.. इतरांना तिला दुखवायचा काय हक्क आहे...??"

थोड्यावेळाने आई आली.. मला झक मारत डोळे पुसून बाहेर यावं लागलं.. मी दादाकडे रागाने पाहिलं.. हो रागवलेच होते मी त्यावर... शाळेतली चार टुकार मुलं काय बोलतात यावरून स्वत:च्या बहिणीवर संशय घेणं त्याला शोभलं का? मी चेहरा धुतला, आवरलं आणि गुमान पुस्तकात तोंड घुसडून बसले..

तेवढ्यात दादा आला.. "ए भवाने"

"फुट तिकडे! मला बोलायचं नाहीये तुझ्याशी"

"मला पण बोलायचं नाहीये. जरा हळु किंचाळ... पुस्तक उलटं धरलंय हे सांगायला आलो.. आईला कळेल लगेच भांडण झालंय असं आणि तिची CBI चौकशी तर माहितीये तुला"

मी पुस्तक सरळ केलं..

"निघ जा इथून.."

दादा तावातावात गेला..आणि त्याही दिवशी मी रडत रडतच झोपले..



# चिकित्सा

रडतानाही मन विचारच करत होतं.. काल रात्री दादाने किती समजुतीने घेतलं..आणि आज?? एवढा विचित्र कसा वागु शकतो तो? कालच्या आणि आजच्या दादात किती फरक आहे! असं काय झालं असेल की दादा डायरेक्ट गृहित धरून चालु लागला दॅट आय एम हॅवींग अफेअर विथ राकेश..आणि हाईट तर बघ शारदे, तुझ्याशी कसा खेकसुन वागतो आणि राकेशशी! नंबर घेतला त्याचा.. व्हॉलीबॉलला बोलवलं..एवढं गुळपीट! बाय द वे, उद्याचं काय? उद्या परत राकेश येईलच बोलायला. काय सांगणारेस त्याला तु? उद्या कसा पळ काढणार? आजपण दादा भेटला नसेल नं त्याला!!

"ए तू झोप गं..मलापण झोपु दे.." - मी

सकाळ झाली. माझी अर्धी रात्र रडण्यात आणि विचारात गेली होती. अजिबात उठवत नव्हतं.

"शारदाsss, ऊठ चल...सात वाजले..किती लोळशील?"

"आई, पाच मिनीट,--- बस.."

"ऊठ! बाबांना तयारी करायचीय तिकडे"

मी उठले.. झोप खुपणारे डोळे मिचमिच करत चोळत मी घरभर फिरले.. कुठे गेला?? दादा कुठे गेला?? "आsssईsss..दादा कुठेय?"

"अहो, आज सूर्य कुठून उगवलाय बघा जरा बाहेर.. कोण कोणाला शोधतंय बघा.."

"आई गप ना.. सांग पटकन कुठे गेलाय.. आई... आई... पटकन.."

"अगं काय झालं एवढं.. गाडी पुसतोय खाली"

जीव भांड्यात पडला. मला वाटलं...... राकेशला भेटायला.... छे एवढ्या सकाळी!

फोन... दादाचा फोन... त्याने नंबर घेतलाय राकेशचा.. डिलीट करून टाकते.. त्याला काय कळणारेय.. कुठे ठेवला असेल याने फोन?? सोबत नेला नसेल ना!

“काय शोधतेस गधडे?”

“....”

"कार्टे, तोंड धु आधी..मग फोन शोध.."

दादा आला..आता काही शक्य नाही..

"मी फोन शोधत नाहीये..फिरतेय फक्त इकडे तिकडे.."

"ओहोहोहोहो.. हं.. म्हणे फिरतेय.."

"तिरसट..."

“कुजकट..”

झाली सकाळ.. झाला दिवस सुरू... काल झोप केव्हा लागली कळलं नाही.. पण डोकं चढलं होतं.. नाक जाम झालं होतं.. डोळे सुजुन बारीक झाले होते.. लाले लाल झाले होते..

"किती वाजेपर्यंत रडलीस काल ठमे?"

त्याच चिनी डोळ्यांनी मी माझी स्पेशल खुन्नस दादाला दिली..

"हे बघ तुझ्यावर संशय नाही घेतला मी.. फक्त मला कळु देत की कुठे चुकतंय ते.. तुझ्या मनात तसं काही नसेल मान्य आहे. पण त्याची बाजू तपासली पाहीजे ना! शेवटी ही इज अ बॉय..मी आधीच म्हटलं होतं.."

“तूला काहीही वाटो रे, पण म्हणून तू त्याच्यासाठी माझ्यावर दाऊट घेणारेस?"

"तू नाही त्याच्याचसाठी भांडत माझ्याशी ?"

आमचे वेगवेगळे सूर ऐकून आई बाहेर आली.

"काय चालुए तुम्हा दोघांचं? तीन दिवसांपासून जरा जास्तच गुलूगुलू चाल्लंय!" – आई

"उड्या मारते ही नुसती. गीत मंच. पेटी, गॅदरिंग. अजिबात अभ्यास नाही करत. म्हणून रागवतोय तिला"

"ओ! ओ! तू जसा खूप अभ्यासु वाया चाल्लायस लेका! या रविवारी हे आले की त्यांना सांगणारे तुझ्या उंडारक्यांबद्दल" – आई. आणि मग दादा आणि आईतच जुंपली.

मला दादाचं असं दुटप्पी वागणं कळत नव्हतं.. मधूनच माझ्याशी भांडायचा माझ्यावर संशय घेऊन.. आणि मधेच मला समजवायचा! दादाच्या मनात नक्की काय चालुए ह्या विचारात माझा दुपारपर्यंतचा वेळ गेला. तयारी झाली.. "हुश्श..देवा, प्लीज तू सांभाळून घे रे आज..मी काय उत्तर देऊ राकेशला?"

"तुला खात्री आहे की तो बोलायला येणारंच ? व्वा व्वा..काय बॉंडींग आहे!!" - मन

" ए येडे! बॉंडींग वगैरे काही नाही पण एक सेफ साईड म्हणून आपलं.."

शाळेत गेल्यावर राकेश गेटपाशीच उभा होता. मी त्याला पाहिलं. त्याने मला पाहिलं..मी मान खाली घातली आणि सरसर चालु लागले.. तिरक्या डोळ्यांनी त्याच्याकडे पहात राहिले.. तो माझ्याकडे येतोय का हे पहात राहिले.. पण! तो आलाच नाही.. "का??????"

सगळेच विचित्र वागत होते.. दादा.. राकेश.. मी वर्गात गेले.. आज मन खूप अस्वस्थ होतं.. कुठल्याच तासाला लक्ष नव्हतं.. वेळ काढायचा म्हणून मी कुठे कर्कटकाने बेंच कोरले, कुठे वहीच्या मागच्या पानावर चिरखडत बसले, कुठे उगाचच गुलाबी वॉटरबॅगमधून पाणी पीत बसले..

आणि मधल्या सुट्टीपर्यंतचा वेळ कसातरी काढला..डबा खायलाही गेले नाही..मैत्रिणींनी खूप बोलावलं पण मी एकटीच बसुन राहिले.. मग एक मोठ्ठा श्वास

घेतला आणि डोकं बेंचवर टेकलं. तेवढ्यात प्राजक्ता आली.."ए हीरॉईन, आज काय बारा वाजवलेत तोंडावर?"

"ए गप यार! माझा मूड नाहीये.."

"ओह..मी बनवते तूझा मूड..बनवू?" हातातल्या जाईच्या कळीबरोबर खेळत खेळत प्राजक्ता बोलली.

"तुझी बकवास मला अजिबात ऐकायची नाहीये"

"बरं! राकेश आला होता माझ्याकडे"

"राकेश! काsss??"

"नको आहे ना बकवास..जाऊ दे.."

"नाटकं करु नको प्राजु..काय बोलला तो?"

"काही नाही.काय झालंय गं तुमच्या दोघांमधे?? तो मला विचारत होता की तू बोलत का नाहीये त्याच्याशी.."

माझ्या मनात राकेशला बदडून काढावं असं वाटत होतं...मला विचारतो ते पुरं नाही का? हिच्याकडे का गेला???? मी वैतागवाणा चेहरा परत खाली वळवला..

"काय झालं. सांग ना शारु.." तिचं कळीबरोबर खेळणं चालूच. आता फुंकर मारून ती कळी फ़ुलवायचा वेडा प्रयत्न करत होती.

"काही नाही गं.. आमची मैत्री तुम्हाला पटत नाही म्हणून मी मैत्रीच तोडून टाकली"

"अगंsss ! हे काही कारण झालं..? शाळेत हे सगळं होतंच असतं! तू पचवायला शिक ना"

"अगं..पण दादाला वाटतं की.."

"सोडून दे..दादा लोकं छळायलाच टपले असतात"

तोच राकेश आला... प्राजुने हातातली जाईची कळी हळूच मुठीत गच्च पकडली आणि त्याच्याकडे वळली.

माझे कान आतुर झाले होते राकेशचा आवाज ऐकायला..पण तो आला, हलक्या आवाजात प्राजक्ताशी कुजबुजला आणि निघून गेला.. माझ्याकडे पाह्यलंही नाही. माझा चेहरा अजूनच उतरला..

तो जाताच प्राजु परत माझ्याकडे वळली आणि हातातल्या कळीशी खेळत खेळत म्हणाली.."पण शारु..तो का गं एवढा खोदून खोदून विचारतोय तुझ्याबद्दल? त्याच्या मनात..."

ती बोलायचं थांबली. पण तिला काय म्हणायचंय ते तिचं म्हणून झालं होतं. उरलेलं बोलणं आमच्या डोळ्यांनी केलं. आणि आम्ही दोघी फक्त बघत राहिलो एकमेकींकडे.



# फ्री बर्ड

देवा शप्पथ असा विचार मनात कधीच आला नव्हता.. राकेश असा मुलगा नव्हताच मुळात.. म्हणजे मीपण तशी नव्हते तरी... ! घंटा वाजली. प्राजक्ता तशीच वळून वळून बघत तिच्या वर्गात गेली. आता मात्र मी नवीनच पेचात पडले होते. "ए शारे, सांभाळ हं..हे काय चाल्लंय. तो बोलत नाही तुझ्याशी, प्राजक्ता वेगळंच सांगतेय, दादाचं वेगळंच चालुए.. काय अर्थ आहे याचा?" -मन

मी निशब्द.. संशयाचं पिल्लु मनात शिरलं ना की काय काय होतं याचं प्रत्यक्ष चित्रिकरण करावं इतकी वाईट परिस्थीती होती ती माझ्या लेखी.. मग मी माझं लक्ष जाणून बुजून अभ्यासात वळवायला सुरुवात केली..राकेशचा विषय मनात येऊच द्यायचा नाही.. घरी गेलं की सुद्धा खायचं प्यायचं आणि अभ्यासाला लागायचं.. शाळेतही मुद्दाम बाईंना शंका विचारायच्या.. जाताना येताना क वर्गाकडे बघायचंच नाही.. कुठेही राकेशचा विषय काढायचा नाही, बोलायचं नाही.. मी हळुहळु स्वत:वर नियंत्रण ठेऊ लागले.. माझ्यातला बिंधास्तपणा जणु हरवू लागला होता.. आणि याला कारणीभूत होते ती मीच !

या साऱ्यामुळे माझा स्वभाव आता घुमा होत होता.. मी एकटं रहाणं प्रीफर करु लागले. निष्क्रीय झाले.. एखादी गोष्ट पटली नाही की ती खोडून काढणारी मी आता कुठल्याच गोष्टीवर प्रतिक्रीया देत नव्हते.. निरुत्साही झाले होते.. फक्त आजुबाजूला काय चाल्लंय हे पहायचे.. दरम्यान राकेशही माझ्याशी बोलायला आला नाही.. मीच त्याला असं सांगितलं असल्यामुळे दुसऱ्या कुणाला याचं दोषी मानणं शक्य नव्हतं..

असंच सगळं रेटत असताना एका मधल्या सुट्टीत मी राकेश आणि मनिषाला एकमेकांशी बोलताना पाहिलं..अचानक अंगात पुर्वीची शारदा घुसल्यागत वाटलं.. त्या दोघांची मैत्री मला नेहमीच खटकायची.. आणि तेव्हा तर राकेश माझा चांगला मित्र होता.. आता मी त्याच्याशी मैत्री तोडलीये म्हटल्यावर मनिषाने माझी जागा घेतली तर? अशी भिती मनात जागी झाली.. क्षणभर जाऊन त्या दोघांचं बोलणं तोडावंसं वाटलं.. पण नंतर पाऊलं आपोआप थांबली.. कारण त्यानंतर येणाऱ्या प्रश्नांना द्यायला लागणारी उत्तरं माझ्याकडे नव्हती.. आणि मनिषा माझी एवढी खास मैत्रिणही नव्हती की मी तिच्याशी बोलायला जाईन किंवा तिला दुसरीकडे खेचत नेईन.. उगंच इकडे तिकडे फिरण्याचा आव घेत मी त्या दोघांवर नजर ठेवत होते..

"थेंक्स शारु" म्हणताना राकेश ने मला केलेलं शेकहॅन्ड त्याने दुसऱ्याला करु नये असं मला खूप वाटत होतं.. पण त्यांचं बोलणं सुरूच होतं.. "एवढं काय बोलतायत हे?? जा ना. तू जाऊन बघ ना.." - मन

"नको.. मी त्यांच्याशी बोलत नाहीये ना.." -मी

"ही बेल कशी नाही वाजली अजून.. माधव दादा झोपला की काय!!" -मन

"थांब आपण बघून येऊ..चल पटकन" -मी

मी स्टेजच्या मागून पळत पळत ऑफिसकडे गेले.. मी पोहोचणार तेवढ्यात माधव दादाने बेल दिली.. हुश्श झालं.. मग मी माघारी फिरले.. पण ते दोघं तिथे नव्हतेच! आपापल्या वर्गात गेले असतील असा अंदाज बांधत मीही माझ्या वर्गाकडे मोर्चा वळवला.. शाळा सुटेपर्यंत माझ्या डोक्यातून हा विषय गेला सुद्धा.. मन पूर्ण कोरं झालं होतं..

त्यादिवशी मी खूप हळु हळु चालत घरी गेले.. एकटीच गेले.. लांबच्या रस्त्याने गेले.. माहिती असलेला एरीया पहिल्यांदाच पाहतेय अशा थाटात सगळीकडे नजर टाकली.. स्टेशनरीसाठी प्रसिद्ध असलेलं 'प्रसन्न स्टोअर्स' आज खूप मोठं भासलं.. त्या स्टोअरमधल्या रंगांच्या पेट्यांनी जणू मला मोहिनी घातली. रोजचंच हे दुकान आज इतकं सुंदर का दिसतंय? त्याच्याच वरच्या मजल्यावर बँक पण आहे हे तर मला माहितंच नव्हतं.. आणि कोपऱ्यावरच्या मोठ्या झाडाखाली कसल्यातरी फुलांचा सडा

पडला होता. मी वाकले. ओहो. बकुळ. वर पाहिलं. बकुळीचं डंवरलेलं झाड. मी वेड्यासारखी किती वेळ बघत राहिले. तोच जोराचा वारा आला. आणि एकच जोरदार पुष्पवृष्टी झाली. तशी मी भानावर आले.

मी रोज किती फास्ट चालते हे मला इतर लोकाकंडे पाहून आज कळलं होतं.. असंच रेंगाळत मी घरी पोहोचले.. फ्रेश झाले.

तशी मी ऑलरेडी फ्रेशच झाले होते.. कधीच न गेलेल्या प्रांतात गेल्यावर सगळं जसं भासेल तसं मला जाणवत होतो.. डोक्यावरून हर्क्युलस उतरल्यासारखं वाटत होतं.. खूप हलकं, जसं एखादं फुलपाखरु! आज दादाला खुन्नस दिली नाही, टीव्ही पाहिला नाही, चिडचिड केली नाही.. उलट आईला चार वेळा जास्त बिलगले, जुनी चित्रकलेची वही काढून पहात बसले, काही न बोलता चेहऱ्यावर प्रसन्नता घेऊन बसले.. जणु शेवटचा दिवस आयुष्याचा.

आज जेवणही जरा जास्त चविष्ट लागलं, गादी अजून मऊ वाटली, झोप जरा शांत लागली..सकाळही त्याच शांततेत झाली.. अगदी आंघोळ करताना पिअर्स साबणाच्या वडीचा वासही हवाहवासा वाटला. मस्त वाटत होतं..तयारी झाल्यावर मी शाळेत जायला निघणार तेवढ्यात दादा म्हणाला- शारे, आज मला काम आहे तुझ्या शाळेकडे संध्याकाळी.. मी येतायेता घ्यायला येईन तुला"

"हो चालेल ना.. टाटा"

दादाला एक मस्त स्माइल देऊन मी निघाले. याचं दादाला खूप आश्चर्य वाटलं असणार..एरव्ही, "तू अजिबात येऊ नको..माझ्या मैत्रिणी चिडवतात मला लहान मुलगी म्हणून..मी मोठी झालीये" वगैरे उत्तरं दादाला मिळायची... पण आज.. जादू झाली होती.. मी निघाले.. कालसारखी हळुहळु चालत, तरंगत, रस्ता न्याहाळत, रमत गमत शाळेत पोहोचले..नेहमीप्रमाणे गेटवर चिंचा बोरांची हातगाडी. बाजूलाच फुलवाली बाई. इतक्यात राकेश दिसला..

मी त्यालाही एक स्माईल दिलं.. तोपण माझ्याशी हसला.. आज आमच्यात रोजसारखं कोल्डवॉर झालं नाही..तेवढ्यात आनंद आला..

"शाSSSSSरु..."

"अंssssssडु.."

" हा हा हा.. आज चिडली नाहीस..! सूर्यच उगवलाय ना नक्की?"

"हो मग.. तू उठून काहीही फाल्तू बोलशील आणि मी त्याला भीक घालत बसु का!"

"अरे शारदा.काय डायलॉग मारते तु.. व्वाह.. प्रेमात पडलीस की काय! सांगायला पाहिजे त्या कदमला"

"फुर्र्र..वळू.. निघ चल.." मी खिदळत बैलाला हाकलतात तसा आविर्भाव करत त्याला हाकलला.

"हा हा हा..टाटा, चल वर्गात भेटु"

मलाही आश्चर्य वाटलं की मी आंनदला कसं एवढं लाईटली घेतलं..! असो..मी वर्गाकडे आगेकूच केली..आणि वाटेत प्राजक्ताकडून कळलं की राकेश आणि मनिषा हे दोन दिवसांत येऊ घातलेल्या घटसंमेलनाचं सुत्रसंचलन करत होते..

"ओह..! म्हणजे..ओ.. ओ..ओके.. म्हणून काल मधल्या सुट्टीत ते एवढं बोलत होते तर.."

माझ्या मनातले संशयाचे पिल्लु लुटुलुटु शेपटी हलवत एकदम शिस्तीत एका रांगेत बाहेर पडले.. कुठेतरी थोडंसं खटकलं.. मनिषा आणि राकेश एकत्र म्हटल्यावर कुठेतरी चलबिचल निर्माण झाली.. थोडीशी अस्वस्थता निर्माण झाली.. मी वर्गाकडे जायला लागले तेवढ्यात ऑफिसच्या दिशेने पाठक सरांनी आवाज दिला.. "भावे..भावेssss..इकडे ये पाच मिनीट"

मी गेले आणि काय! राकेश आणि मनिषा तिथे ऑलरेडी प्रेझेंट होते..

"हं..भावे..दोन दिवसांनी म्हणजे २५ तारखेला आहे आपलं घटसंमेलन..तर त्यासाठी..तुझ्या लक्षात आलंच असेल.. स्वागतगीत बसवायचं आहे.. म्हणजे गॅदरींगला झालं तेच.. हे दोघं एंकरींग करतील.. त्यांची थोडी प्रॅक्टीस घ्यावी लागेल.. बाकी तू तर बेस्ट आहेस. तुझी खात्रीच आहे.. तर माझा तिसरा तास आहे ना तुमच्या वर्गावर? तेव्हा ये तळघरात..तिथे आपण तालिमी रंगवू..बरं का! तुम्ही दोघं पण ऐका.."

"हो सर..येऊ?"

सरांची परवानगी घेत मी बाहेर पडले.. मागून राकेश आणि मनिषाही आले..

"राकेश.. तू जाशील तेव्हा मलापण बोलंव.. दोघं सोबत जाऊ" -मनिषा म्हणाली.

"बरं..! शारु मी जाताना तुला दिसेलच. तू तेव्हाच निघ.. मग आपण सोबत जाऊ मनिषाला बोलवायला"

मनिषाचा जोही काही डाव होता तो सरळ सरळ फसला.. मला तिचा अकारण राग येत असल्याने राकेशच्या अश्या उत्तराचा मला निखळ आनंद झाला.. काल ते दोघं इतकं का बोलत होते हे मला कळालं होतं, आता ते दोघं माझ्यासमोर प्रॅक्टीस करतील हे ही मला माहित होतं.. त्यामुळे मनिषा कितीही काहीही करो, मी समोर असेनच ही खात्री माझ्या डोळ्यातून चमचम करत होती...



# हलकेच

पहिले दोन तास गेले आणि तिसरा तास उगवला.. राकेश बाहेर आला.. मग मीपण स्प्रिंगसारखी ताडकन उठून निघाले.. आम्ही मनिषाला बोलवायला गेलो.. तिच्या वर्गापर्यंत जाताना राकेश माझ्याशी काही बोलला नाही.. आणि नंतरही बोलला नाही.. याचं मला वाईट तर वाटत होतं. पण तो किती समजूतदार होता, हे दवंडी पिटून सांगावसं वाटत होतं, अख्ख्या शाळेला.. तिथून आम्ही तळघरात गेलो.. प्रॅक्टीस सुरु झाली.. आधी स्वागतगीत.. ईशस्तवन.. मग सूत्रसंचलन.. सगळं छान जुळून येत होतं.. मधे मधे आम्ही थोडा ब्रेक घेत होतो.. त्यातही मनिषा आणि राकेश बोलायचे पण मी काहीच नाही.. असाच वेळ गेला.. तास गेले.. आणि शाळा सुटली.. मी गप्पा टप्पा करत बाहेर येत होते तोच बाहेर दादा दिसला.. "अरे हो ! आज दादा येणार होता..त्याच्यासोबत जायचंय ना!"

मी दादाच्या दिशेने गेले.. ढुपकन गाडीवर बसले, दादाने किक मारली आणि आम्ही निघालो..

"काय काम होतं रे तुझं? झालं का ?"

"हो झालं...आत्ताच आलो आणि लगेच शाळा सुटली तुझी"

"बरंय, तुला जास्त नाही थांबावं लागलं!"

"हं!.. पण तू आज एकदम शिस्तीत 'हो' कशी म्हटली माझ्यासोबत यायला.. तेही शाळेतून.."

"असंsssच! ॲक्चुली माझे पाय दुखतच होते.. म्हटलं चांगलंय गाडीवरून भरकटायला मिळेल"

"अच्छा... यात पण डाव खेळलीस तर.. बरं.. चल पाणीपूरी खाऊ.."

"तू? तू नेणार पाणीपूरी खायला? मला?"

"हो गं..चल!"

"चल..मला काय! चांगलंच आहे..पण आई ओरडली तर तुझं नाव हं"

"नाही ओरडणार गं! चल.."

आज काय सरप्राईज मिळत होते..

"मग..काय काय झालं आज दिवसभरात.."

"काही नाही. घटसंमेलन होणारेय.. मी ॲज युजुअल पेटी वाजवेन.. मनिषा सुत्रसंचालन करणारेय आणि राकेश आहे तिच्या सोबतीला.."

"हं ! बरं.. मग प्रॅक्टीस झाली का?"

"आज तर कळलंय रे.. आज केली तेवढीच.. सर म्हटले की माझा काही प्रॉब्लेम नाही.. फक्त त्या दोघांची थोडी प्रॅक्टीस करून घ्यावी लागेल.."

"अरे वा.. छान.. अजून एक खास न्युज तुला. आज तुझा मित्र येणारेय खेळायला आपल्या इथे.."

" कोण?"

"द ग्रेट मिस्टर राकेश कदम"

"ओ बरं.."

"बरं? नुसतं बरं? एक्साईटमेंट नाही का?"

"कशासाठीची एक्साईटमेंट? त्यात काय नवीन आहे..परवा पण तर आला होता.."

"हं !..बरोबर तुला कसलं सरप्राईज? तुला त्याने आधीच सांगितलं असेल माझ्या !"

"चल रे..मी..नाही बोलत त्याच्याशी..बरेच दिवस झाले.."

"हं ! हं! हं?????? का ते?"

"असंच.."

'अँ?? असंच? काहीही हं..तु? त्याच्याशी बोलणार नाहीस? तो तर तुझा खासम् खास फ्रेंड आहे ना!"

मला पाणीपुरीचा एक सणसणीत ठसका लागला. नाकातच गेलं पाणी. पण दादाचं वाक्य त्याहून जास्त डोक्यात गेललं.

"प्च..हेच..हेच नाही आवडत मला!"

"काय..म्हणजे"

"खरं सांगु का दादा..? मला ना तुमच्या सगळयांची मेंटॅलिटीच पटत नाही... रॅदर कळत नाही.. आमची चांगली मैत्री काय झाली, तुम्ही सगळयांनी गृहितच धरलं की मला तो आवडतो. मग चिडवा चिडवी अँड ऑल... मी खरं सांगते तर तेही ऐकत नाही.. छे.. मला वीट आला सगळयाचा.. मग मी त्याला सांगितलं की तू माझ्याशी बोलत जाऊ नकोस. मला तुझ्याशी बोलायचं नाही.. तो बिचारा तेव्हापासून बिनबोभाट असं करतो.. ते ही कारण माहित नसताना..!!"

"बस बस किती बोलणार त्याच्या बाजूने..! बरीच माहितीये हं तुला त्याच्याबाबतीत!"

"प्च बघ परत तेच...हट यार..सोड चल.."

दादाने पाणीपुरीचे पैसे दिले आणि आम्ही निघालो.. एव्हाना एक तास उलटला होता. प्रसन्न स्टोअर्सच्या शेजारून टर्न घेतला.. आणि आम्ही नेहमीच्या रस्त्याला लागलो. मी माझ्याच गुंगीत असताना दादा एकदम म्हणाला-

"शारदा.. तो बघ.. तो राकेशच आहे ना"

मी ते दृश्य बघून चाट पडले.. मला शॉक बसला.. तो राकेशच होता..

" हो दादा..त्- तो.. तो राकेशच.. आहे.."

राकेश एका पानटपरीच्या शेजारी ५-६ टपोरी पोरांबरोबर बसला होता. शाळेत स्वच्छ आणि कडक इस्तरीचे कपडे घालणारा राकेश इथे रावडी आणि 'भाई' च्या गणवेशात दिसला.. जणु ती मुलं त्याला काही समजावत होती आणि हा गुमान सगळं ऐकत होता. दादाने थोडीशी अलिकडे गाडी थांबवली..

"बघ शारदा, तुला सांगत होतो ना लांब रहा या मुलापासून"

"पण..राकेश...इथे..कसं शक्य आहे.. याआधी कधी दिसला नाही तो असा.. म.. म्हणजे.."

मला काय बोलावं सुचत नव्हतं.. आमच्या शाळेतला आदर्श विद्यार्थी शाळेच्या बाहेर असा विक्षीप्त कसा वागु शकतो? म्हणजे.. आनंद सुद्धा कधी असा दिसणार नाही याची गॅरंटी मी देऊ शकते मग राकेशचा तर प्रश्नच येत नाही !!!!!

"याआधीचं सोड.. 'जाग आली तीच सकाळ' म्हणतात ते हेच.. कळलं ना आता तुझ्या मतातलं 'चांगलं व्यक्तीमत्त्व' किती चांगलंय ते??"

थोड्या वेळापूर्वी 'वाईट मेंटॅलिटी' आणि 'चांगली पर्सनॅलिटी' बद्दल बोलणारे माझे ओठ आता शिवले गेले होते.

"तुला "हा" आवडायचा ??!! श्शी...दिसतं तसं नसतं हेच खरं" -मन

"मला तो आवडायचा नाही.."आवडतो... आवडतो..." हे पालुपद तर तू लावून धरायचीस. आता पलटी मारु नको शहाणे.." –मी

या वेड्या प्रसंगानंतर माझं आणि माझ्या मनाचं तुंबळ विश्वयुद्ध सुरु झालं होतं. 'आपली बघण्यात काहीतरी चूक होतेय' या भ्रमात माझे डोळे परत परत त्या कोपऱ्यात बघत होते. वारंवार 'हा नक्की राकेशच आहे का' ही खात्री करून घेण्याच्या प्रयत्नात होते. या सगळयात दादा बरंच काही बोलत होता जे माझ्या कानांवर पडूनही न पडल्यासारखं होतं.. माझं लक्ष फक्त त्या टपोरी मुलांकडे आणि त्यात घुटमळणाऱ्या एका आदर्श विद्यार्थ्याकडे होतं.

तेवढ्यात राकेशने आमच्याकडे पाहिलं. आणि तो त्या मुलांच्या अजून जवळ जाऊन तिथल्या पायऱ्यांवर बसला. खरंतर आम्ही तिथे असणं त्याला अनपेक्षित होतं. मी त्याच्या डोळयात डोळे घालुन पाहिलं. त्याने नजर चोरायचा प्रयत्न केला. त्याच्या चेहऱ्यावरचा रंगच उडाला होता. वर्षाच्या पहिल्याच दिवशी काडीचीही ओळख नसताना मी ज्या मुलाची बाजू घेतली तो मुलगा कधी असाही रंग दाखवेल असं चुकूनही मनात आलं नाही. ज्या मुलाशी बोलायला मी मधल्या सुट्टीची आतुरतेने वाट पहायचे त्याच्याकडे बघायलाही आज किळस वाटत होती. त्याचा शेकहॅंड...

"दादा चल इथून" - मी दादाला गंभीर आवाजात म्हटलं.. दादाने जोरात अॅक्सेलेटर पिळलं आणि गाडी पळवली.

बरंच पुढे गेल्यावरही मी एकदा दोनदा राकेश कडे वळून पाहिलं. तोही आमच्याकडे पहात होता. मात्र आज त्याच्या चेहऱ्यावरचे भाव मला वाचता आले नाही. गेल्या पंधरा मिनीटात जे काही झालं होतं ते माझ्यासाठी पचवायला फार कठीण होतं. नक्की काय घडतंय या विचारात मी सरळ पाहिलं तर दादा आरशातून माझ्याकडे बघत होता. त्याच्या नजरेतून त्याने मला 'दम' दिला आणि बजावलं- "राकेश कदम चॅप्टर आजपासून क्लोज". मी पण नजरेतूनच "सॉरी" म्हणत मान खाली घातली.

एका भयाण शांततेत आम्ही घरी पोहोचलो. मी काहीही न बोलता तशीच खाली घातलेली मान घेऊन खोलीत गेले. जो मुलगा किती चांगला आहे हे पटवण्यात मी आक्रस्ताळेपणा करायचे आज तो खरोखर 'किती' चांगला आहे याचं प्रात्यक्षिक मला मिळालं होतं. एका 'डिप्रेस्ड' मूडमधे मी चेहऱ्यावर पाणी मारलं..पण 'फ्रेश' काही झाले नाही. तेवढ्यात दादा आत आला.

"पुरे झालं विचार करणं.. यातून योग्य काय तो धडा घ्या आणि अभ्यासाला लागा आता.."

कालपासून जे शांत शांत वाटत होतं त्यापुढे 'हे' वादळ येणार होतं याची पुसटशीदेखील कल्पना नव्हती. मी उगंच अभ्यासाचा आव आणत पुस्तक धरून बसले.

पण दादा परत आला आणि मी उलटं धरलेलं पुस्तक सरळ करून निघून गेला. मी मात्र एखाद्या बाबतीत इतका विरोधाभास कसा असु शकतो याचाच विचार करत राहिले. त्याठिकाणी राकेशला पाहिल्यानंतर माझी त्याच्याबद्दलची सगळी चांगली मतं आपोआप खोडून निघाली. सातवीच्या पहिल्या दिवसापासून राकेशच्या संबंधांत घडलेले सारे प्रसंग माझ्या डोळ्यासमोर एखाद्या पुस्तकाच्या पानांसारखे फडफड करत उलटु लागले. आणि दादाच्या दबावात का होईना मी फार आधीच त्याच्याशी बोलणं बंद केलं याचा थोडा फार आनंद झाला.

# शहाणपण

विचार करता करता खिडकीतून बाहेर पाहिलं तर कॉलनीतली मुलं व्हॉलिबॉल खेळताना दिसली. आणि एकदम स्ट्राईक झालं-

"आज राकेशही खेळायला येणार आहे असं दादा म्हणत होता !"

मी त्याला शोधू लागले. तो काही दिसला नाही. पुन्हा शांत होऊन झालेल्या प्रसंगाचा विचार करत बाहेर बघत बसले तेवढ्यात ग्राऊंडच्या एका कोपऱ्यात जिथुन कॉलनीचं गेट होतं तिथे मला दादाचा भास झाला. पाठमोरा असल्याने मला नीट कळलं नाही पण साधारण उंचीवरून आणि कपड्यांवरून तो दादाच असल्याच कळत होतं.

"हं... भटकत असतो कायम इकडे तिकडे.. कोणाशी बोलतोय काय माहित?"

त्रासलेल्या नजरेने परत एकदा विचार करत मी दादाकडे बघत राहिले. थोड्या वेळानंतर दादाचं बोलणं झालं आणि तो मागे वळला.

"हं दादाच होता..मी कुठेही आणि कसाही ओळखेन त्याला"

मी खुदकन हसत मनातच म्हटले आणि परत गेटवर पाहत बसले. पण धक्क्यांची सिरीज थांबलीच नव्हती! दादा ज्या मुलाशी बोलत होता तो......राकेश होता ! राकेश!

"तो परत का गेला?" - मन

"मगाशी झालेल्या प्रकारामुळे दादाने इथे यायचं नाही असं सांगितलं असेल त्याला म्हणून तर गेटवरंच बोलत उभे होते ना !"- मी

"हॅट.. काहीही... मगाशी राकेश ज्या मवाली अंदाजात होता त्यावरून तुला वाटतं का तो कुणी 'इथे येऊ नको' असं म्हटलेलं ऐकून घेईल?" -मन

"हं ! ते तर आहे गं.."

"एssssss... तू राकेश ला पाहिलं आत्ता !! तो.. त्याच्या नेहमीच्या टकाटक ड्रेसमधे होता!! व्यवस्थीत भांग पाडलेला आणि त्याच्या नेहमीच्या ऐटीत... मगासारखा चुरगळलेले कपडे आणि अर्धी बटणं उघडलेली नव्हती !!"

आता मात्र माझा पार गोंधळ उडाला होता. ही गोष्ट खरी होती. थोड्या वेळा पूर्वी राकेशचं चुकीच्या ठिकाणी दिसणं, मग नजर चोरणं, आणि आता परत नेहमीच्या अवतारात येणं, दादाशी बोलणं, गुमान निघून जाणं या गोष्टी फार विचित्र होत्या.. कशाचीच एकमेकाला लिंक लागत नव्हती. तो राकेशचा जुला भाऊ होता की काय? पण मग त्याने आपल्याला कसं ओळखलं? काय गडबड आहे? काहीच लिंक लागत नव्हती. पण काहीतरी वेगळंच घडत होतं हे नक्की.. दादा घरी आला. मधे येऊन त्याने हातपाय धुतले. मी त्याच्याकडे गंभीर नजरेने टक लावून बघत होते. "आता तरी दादा काहीतरी बोलेल, सांगेल" या आशेत होते. पण दादाने माझ्याकडे बघीतलं पण नाही. धावत्या मालगाडीसारख्या इतक्या घटना घडल्या आजच्या दिवसात.. पण ही मालिका कधी संपेल याचा मात्र पत्ताच लागत नव्हता..

-----------

दुसऱ्या दिवशी मी शाळेत गेले. काल घडलेलं सारं काही अजूनही माझ्या डोक्यात फिरत होतं.. दादा काल राकेशशी काय बोलला असेल हा विचार मी करत होते. तेवढ्यात गेटवर राकेश दिसला. नेहमी सारखाच. कड्डक इस्तरीचा युनिफॉर्म, तेल लावून भांग पाडलेला चेहरा, चकाकणारे शुज आणि.......आणि चेहऱ्यावर हसु..! तो आजही मला नेहमीसारखी स्माईल देत होता. जणु काल काही घडलंच नाही.. मी नुसतं त्याच्याकडे पाहिलं आणि वर्गात जायला निघाले. माझ्या कपाळावर प्रचंड आठ्या होत्या.

"काय चालवलंय या दोघांनी???? हा एवढं सोज्वळपणे कसा हसु शकतो"

असेच पहिले दोन तास गेले. तिसऱ्या तासाला पाठक सर प्रॅक्टीसला बोलवायला आले. मग मी निघाले. सरांच्या बरोबर राकेश आणि मनिषाही होते. मी वर्गातून बाहेर पडल्या पडल्या मला राकेश दिसला आम्ही दोघानी एकमेकांकडे पाहिले पण स्थिती बदललेली नव्हती. मी त्याच शंकाग्रस्त नजरेने त्याच्याकडे पहात होते आणि तोही तेवढ्याच सोज्वळतेने ! माझ्यासाठी कालच्या दिवसात खूप काही झालं होतं पण त्याच्या लेखी काहीच नाही. आम्ही सगळे तळघरात निघालो. राकेशचं हे दुटप्पी वागणं मला खटकत होतं. मी प्रचंड तणावाखाली आले.

जर राकेशचे कालचे हावभाव आज कायम असते तर मला ही गोष्ट पचवणं सोपं झालं असतं. पण खूप मोठं वादळ आलं आणि गावातलं एकही घर उध्वस्त झालं नाही ही बाब जेवढी आक्षेपार्ह आहे तेवढंच राकेशचं वागणंही आक्षेपार्ह होतं. आणि त्यातल्या त्यात काल दादाशी त्याचं झालेलं बोलणं हे वेगळीच दिशा दाखवत होतं. या सगळ्यात मी इतके बुडून गेले की पेटी वाजवताना माझ्याकडून प्रचंड चुका झाल्या. कधी नव्हे ते पाठक सरांचे बोलणे मी खाल्ले. प्रत्येक वेळेस सॉरी म्हणत मी चुका करतच राहिले आणि विचारही! तालिम संपली..आम्ही वर्गात गेलो. आजतर बेंचवरही काही खरडण्याचा मूड नव्हता. 'का? कसं?' याचाच विचार करण्यात दिवस गेला. पंतप्रधानांनीही कधी एवढा विचार केला नसावा तेवढा मी करत होते. मला राकेश आणि दादाला बरेच प्रश्न विचारायचे होते पण कालच्या प्रसंगानंतर राकेशकडे जाऊन जाब विचारणं मनाला पटत नव्हतं आणि दादा तर एनीहाऊ उत्तरं देणारच नव्हता.. मी एक मोठ्ठा श्वास घेतला आणि डोक्याला थोडावेळ विचार करण्यापासून थांबवण्याचा निरर्थक प्रयत्न केला. दिवस कसा गेला कळलंही नाही. शाळा सुटली. मी बॅग भरली आणि कपाळावरच्या आठ्यांना घेऊन निघाले.

जाता जाता स्टेजच्या कोपऱ्यापाशी राकेश उभा दिसला. मी मुद्दाम त्याच्या समोरच्या कोपऱ्याला थांबले. या क्षणाला मात्र मला त्याचे हावभाव वाचता येत होते. त्याला नक्कीच मला काहीतरी सांगायचं होतं. मे बी कालच्या प्रकाराबद्दल असेल! मी थांबले. माझ्याही हालचालीतून त्याला कळलं की मी त्याला स्पष्टीकरण

द्यायची परवानगी दिली होती. बाहेर पडणाऱ्या मुलांच्या लोंढ्यांना पार करत राकेश माझ्यापाशी आला. आणि काही सांगायला तोंड उघडणार तोवरच मी त्याला विचारलं-

"काल संध्याकाळी दादाचं आणि तुझं काय बोलणं झालं?"

राकेश थोडासा गोंधळला.

"शशी दादाशी? काहीच नाही.."

"हे बघ मी तुम्हाला दोघांना कॉलनीच्या गेटपाशी बोलताना पाहिलंय. तुला सांगायचं तर सांग नाही तर मी निघते. या एका प्रश्नाशिवाय मला तुझ्याकडून दुसरं कशाचंच उत्तर नकोय"

-राकेश काहीच बोलला नाही..मी काय समजायचं ते समजुन घेतलं. खरंतर मला त्याच्याकडुन खूप काही जाणून घ्यायचं होतं. म्हणून मी उगंच माझा स्कर्ट नीट कर. कुठे वेणीच्या रिबीनीचं फुलं नीट करं. कुठे उगंच कॉलर ताठ कर वगैरे चाळे करत होते. तरी राकेश काहीच बोलायला तयार नव्हता. शेवटी मी वाकड्या बोटाने तुप काढण्याची पद्धत अवलंबत त्याला म्हणाले-

"ठीकेय..मी निघते.. परत फिरून माझ्यापाशी काहीच बोलायला सांगायला येऊ नको. थॅंक्स फॉर ऑल धिस."

मी राकेश वर भयंकर चिडले होते. अगदी प्रमाणाच्या बाहेर. तेवढ्यात राकेशने माझं दप्तर खेचलं आणि एकदाचे शिवलेले ओठ उघडले-

"नाही शारु. थांब..प्लीज.."

राकेशच्या तोंडून 'शारू' बाहेर पडलं की मी अक्षरश: वितळायचे. अवचित एखादा अनामिक सुगंध आल्यासारखं वाटायचं. दूरदूर पसरलेल्या समुद्रकिनाऱ्यावर मी एकटीच उभी आहे आणि तिथल्या लाटा प्रचंड वेगाने माझ्या दिशेला येऊन माझ्या अनवाणी पायांना गुदगुल्या करताहेत असं भासायचं. आज माझा जमदग्नी झालेला असतानाही राकेशने एका शब्दात मला शांत केलं.

"हं ! बोला.."

"अं.. ॲक्चुली.. हे बघ कसंय.. तुझ्या दादाला काही आपली मैत्री आवडत नाही. तर आपण यापुढे जेवढ्यास तेवढं ठेऊयात. शाळेतलं जे काम असेल ते."

" हँ ?? हे काही माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही राकेश..!"

"हेच आहे उत्तर..बस चल मी येतो."

"नाही राकेश थांब..दादा तुझ्याशी काय बोलला काल ??"

" हेच..! की तुझ्या आई बाबांना मुलांशी मैत्री केलेली चालत नाही. तो म्हणाला की तू ऐकत नाहीस म्हणून तो मला सांगतोय की तुझ्याशी बोलायचं नाही असं"

मी प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे बघत राहिले. मी पुढे काही बोलायच्या आत तो म्हणाला,

"चल मी येतो."

"आणि त्या पानटपरीच्या शेजारी??"

---पानटपरीच्या शेजारी?-

राकेश अवाक् शांत झाला. थोडा वेळ उगाच केसांत बोटं फिरवू लागला. त्याची ती अदा मला आपोआप शांत करायची. मला अजुन शांत करत तो म्हणाला-

"शारु. . . . परवा तुझा दादा मला भेटला होता.."

"परवा? का? तुमचं काय चालु असतं रे सारखं एकमेकांना भेटणं आणि बोलणं??" मी चिडून राकेशला विचारलं.

"अं.. खरंतर शारु.. मला त्याने हे तुला सांगायला नाही सांगितलं होतं पण. . . ."

"पण ?? पण काय? आणि काय नाही सांगायला सांगितलं?"

"तो परवा मला भेटला आणि तेव्हाच हे म्हणाला की आपली फ्रेंडशीप तुमच्या घरी आवडत नाही.. आपली म्हणजे कुठल्याही मुलाची. तो म्हणत होता की त्याने खूपवेळा तुला समजावलं पण तू ऐकलं नाही म्हणून तो माझ्याकडे आला.."

माझ्या डोक्यात असलेला राग आता दादाकडे कन्व्हर्ट झाला होता.

"या सगळ्याचा काय संबंध कालच्या प्रसंगाशी.."

राकेश हसला.. म्हणाला-

"त्याने मला एक सिंपल आयडिया दिली. थोडासा बंगाळ अवतार करून प्रसन्न स्टोअर्स जवळच्या पानटपरीपाशी पायरीवर बसुन रहायचं.. एकदा का तू मला तिथे पाहिलं की बाकी पुढे काही करायची गरज नाही."

"ओssssssssह !!"

"हं !.. पण नुसत्या गबाळ्या अवताराने काय होणार होतं हे मला कळलंच नाही. म्हणजे त्याला.."

"पण माझ्या सगळं लक्षात आलंय!"

मी राकेशला मधेच तोडत म्हणाले.

"माझ्या सगळं सगळं लक्षात आलंय"

"आणि मग मी तसा बावळट सारखा तिथे उभं राहिलं म्हणून तो काल थँक्स म्हणत होता..हा हा हा"

हं..राकेश खरंच बावळट होता. माझ्या डोक्यावरचं ओझ आता उतरलं होतं.. काल पासून रांगेत उभ्या असलेल्या सगळया प्रश्नांची उत्तरं मला मिळून गेली.

राकेशच्या मते फक्त बावळटसारखं उभं राहणं प्रत्यक्षात किती इंटेंस्ड होतं याची त्या भोळयाला खरंच कल्पना नव्हती. दादाने त्याला सांगितलं आणि त्याने बिनबोभाट ऐकलंही..जसं मी त्याला सांगितलं होतं की माझ्याशी बोलायचं नाही आणि त्याने ते ही ऐकलं होतं...

राकेश गेला. मीही निघाले.

माझा चेहरा एखाद्या सुर्यफ़ुलासारखा खुलला होता. मी शाळेच्या मागच्या रस्त्याने माझ्या घराच्या पुढे असलेल्या शंकराच्या मंदिराकडे निघाले. वाटेत जाता जाता कालपासून लिंक न लागणाऱ्या सर्व गोष्टींचे संबंध मला दिसु लागले. एक एक गोष्ट कशी कशी घडली आणि त्याचे आपण काय आणि कसे कसे अर्थ लावले हे समोर चित्रासारखं उभं राहु लागलं. चालता चालता मी माझ्या वेण्या सोडल्या आणि

रिबीनी बॅगेत ठेऊन रबरं हाताच्या मनगटाला लावली. मग उगंच राकेशने फिरवला तसा केसांत हात फिरवत केस एका बाजुने पुढे घेतले आणि मंदिरात पोहोचले.

वास्तविक मी मंदिरात आलेच नव्हते. शंकर मंदिराच्या आवारात प्रवेश केल्यावर त्याच्या भल्या मोठ्या अंगणात डाव्या बाजूला एक सुंदर शांsssत तळं होतं आणि सरळ उजव्या बाजूला मंदिराचं दार होतं. हे संपुर्ण मंदिर काळया दगडांत बांधलेलं असल्याने इथे हिमाच्या गुंफ़ेत गेल्यासारखं प्रचंड थंड वाटायचं आणि तितकंच शांत सुद्धा.. मंदिराच्या आजुबाजूला जास्वंदीची गर्द झाडीही होती आणि त्याच्या आड एक गर्द केवड्याचं बन. त्यामुळे इथे येऊन बसायला मला फार आवडायचं.

मुख्य दरवाजातून नुसतं एक पाऊल आत टाकल्या टाकल्या मला फुलावर अलगद बसलेल्या फुलपाखरासारखं वाटायचं. खूप सुरक्षित वाटायचं. शांत वाटायचं. मनातली चलबिचल कुठल्याकुठे पळून जायची.. मी बुटं काढले आणि तळयाच्या दिशेने वळले. पाय थोडेसे ओले केले. तिन चार पायऱ्या चढून मग तळयाच्या कट्ट्यावर पाय लोंबकळत सोडून बसले. पाठीवरून दप्तर बाजूला काढून ठेवलं आणि त्यालाच एखाद्या सशाच्या पिल्लासारखं छातीशी घेऊन पाय हलवत बसले. इथपर्यंत येताना मनात धिंगाणा घालणारे विषय क्षणार्धात निवांत पडले. तिथल्या थंड हवेने मी रिफ्रेश झाले. डोळयांचा थकवा गेला, मनाचा शीण गेला. सातवीच्या सुरुवातीपासून चालु झालेल्या एका शिकवणीचा मला चांगलाच धडा मिळाला होता. ज्या गोष्टींकडे-नात्यांकडे मी फार द्वेषाने किंवा फार प्रेमाने बघत होते त्यांचं खरं स्थान माझ्या लक्षात आलं होतं. ज्या मुलाला मी ऐटदार म्हणायचे तो प्रत्यक्षात किती भोळा होता हे मला समजलं. ज्या भावाला मी खंवचट आहे असं म्हणायचे तो प्रत्यक्षात किती दक्ष आहे हे समजलं. आणि या सगळयाच्या पलिकडे एक भाऊ आपल्या बहिणीला अल्लड वयात वाट भरकटु नये यासाठी 'काय काय' करु शकतो ही कळलं.

आणि अजून एक गोष्ट कळाली..ती म्हणजे- काही वेळेला आपण, 'आपली बाजू किती खरी आहे' हे ऊर बडवून सांगण्याच्या प्रयत्न करत असताना 'ती बाजू खरी अथवा खोटी असली तरी आपल्याला उपयोगी नाही' हे मात्र ठार विसरून जातो. जसं

मी नाही का राकेश किती चांगला आहे, कसा चांगला आहे, त्याची पर्सनॅलिटी, इतरांची मेंटॅलिटी वगैरे बडबडायचे..पण..

हं असो. खरंतर हा धडा नसुन एक अनुभव होता. कदाचित 'आयुष्य ही एक शाळा आहे आणि अनुभव हा एक शिक्षक' हीच म्हण मला खऱ्या अर्थाने समजली होती.

अचानक मला या सगळया प्रकाराचं खळाळून हसु आलं.. मी परत एक मोठ्ठा श्वास घेतला. श्वासात महादेवाच्या देवळातल्या अगरबत्तीचा सुगंध मिसळला. मनाचे सारे भाग सुगंधी झाले. शरीराचे मोरपीस बनले. हलकेच उठून उभी राहिले. दूर दूर पसरलेल्या तळयाच्या संथ सखोल पाण्यावर थेट क्षितीजापर्यंत एक नजर टाकली. बॅग उचलली, चपला हातात धरल्या आणि घाटाच्या फ़रशांचा थंडगार सुखद स्पर्श अनवाणी पावलांनी अनुभवत परत निघाले.



# छोटा बच्चा जानके हमको...



मी काही लेखिका नाही. कधी मधी कविता करते. कथाही लिहायचा प्रयत्न करते. पण प्रसिद्ध करण्याची किंवा कुणाला दाखवण्याची हिंमत होत नव्हती. मग एकदा नामकाकांना यातल्या पाठराखीण या भागातली काही पार्ट दाखवला. त्यांना तो आवडला. पण इतरांना “लिहा लिहा..” म्हणणारे नामकाका मला मात्र म्हणाले, “आधी बारावी होऊन जाऊ दे. मग लिही पुढे”.

तरीही मी लिहीलंच. मनात घोळणारी सगळी गोष्ट जाता येता मोबाईलवर टाईप करून तुकड्या तुकड्यांत काकांना पाठवली. आणि बघता बघता ही लघुकादंबरी झाली सुद्धा. अवघ्या नऊ दिवसांत. दिवाळीची सुट्टी कामी आली. माझ्या शारूची गोष्ट. पहिला भाग. आज प्रसिद्ध होत आहे.

माझ्यासारखी नवी लेखिका जेव्हा काहीतरी नवीन लिहून पहाते तेव्हा त्या लिखाणात खरंच कितपत जान आहे हे माझं मला कळत नसतं. अजमावता येत नसतं. माझीही दोन मनं आपसात वाद घालत असतात. कारण लिखाणाला फुटपट्टीचं माप नसतं. एखाद्या गायकाला किती चांगली आहे हे समजण्यासाठी चांगल्या श्रोत्यांची गरज असते; तसं एका नवीन लेखिकेला तिचं लिखाण किती चांगलं (किंवा कितपत वाचनीय) हे समजायला सुजाण वाचकांची पावती लागते.

मी ठरवलंय. जोवर अशी पावती मिळत नाही तोवर पुढचे भाग प्रसिद्धच करायचे नाही.

तुम्हाला हा भाग आवडला? किती आवडला? पुढचे भाग वाचायला उत्सुक आहात?

तर मग लिहाच : shaaru7th@gmail.com या पत्त्यावर आणि माझ्याशी थेट संवाद साधा.

आणि नाही आवडलं तरी लिहा. सांगा काय नाही आवडलं ते. त्याचाही मला उपयोग होईल. अगदी “कृपा कर, लिहू नको”, असं म्हणालात तरी चालेल.

अजून एक सांगा. ही गोष्ट वाचताना तुमच्या शाळेची आठवण झाली? मित्र मैत्रिणी आठवल्या? तर त्यांना हे पुस्तक पाठवा. त्या निमित्ताने तुमचे जुने दिवस उजळून येतील.

माझ्यासारख्या नव्या लेखकांची पुस्तकं ई साहित्य प्रतिष्ठान प्रसिद्ध करत असतं. ही पुस्तकं प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोहोचावीत अशी त्यांची मनोमन इच्छा आहे. त्यासाठी तुमची मदत हवी आहे. कराल? फ़क्त बारा मराठी मित्रांचे किंवा नातेवाईकांचे ई मेल पत्ते द्या. याच पत्त्यावर : shaaru7th@gmail.com

मराठी ही इतकी सुंदर भाषा आहे. तिचा एक एक शब्द म्हणजे सुंदर फ़ूल. आपल्याला हा वैभवाचा ठेवा पुढच्या पिढ्यांपर्यंत न्यायचा आहे ना? नव्या लेखकांच्या स्वरुपात. नवीन साहित्याच्या स्वरूपात आपली ही भाषा फ़ुलत राहिली पाहिजे. त्यासाठी वाचनाची संस्कृती वाढत राहिली पाहिजे. मराठीत निदान बारा लाख वाचकांपर्यंत आमची ही सुंदर पुस्तकं जायला हवीत असा आमचा प्रयत्न आहे. आणि तो साध्य करायला तुमच्या मदतीची नितांत आवश्यकता आहे. प्लीज ... तुमच्या ओळखीच्या बारा लोकांचे मेल आय. डी आम्हाला पाठवा. दिड लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार?

माझा मेल आयडी लक्षात राहील ना?



shaaru7th@gmail.com

